cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–३०८ | रविवार, दि.२ मार्च २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने– ६ | किंमत ३ रूपये




## संपादकीय

### भाजपमधील अंतर्गत खदखद धोकादायक

महाराष्ट्र, हरियाणा, राजस्थान, मध्य प्रदेश आणि मणिपूर या राज्यांमध्ये काही समान सूत्र आहेत. एक या सर्व राज्यांमध्ये मणिपूरचा आताचा अपवाद वगळता भारतीय जनता पार्टीचे सरकार आहे, तर दुसरे या राज्यांमध्ये भाजपअंतर्गत मतभेद आहेत. यातील महाराष्ट्राबाबत बोलायचे झाले तर पक्षांतर्गत मतभेद जाहीरपणे समोर आले नसले तरी आता कुजबुज असल्याचे सत्तेच्या वर्तुळात फेरफटका मारल्यावर कळते. तथापि, युतीतील उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यात फारसे सख्य नसल्याचे दिसते.

# अतिवृष्टी- पुरग्रस्त शेतकऱ्यांना ७३३ कोटी रुपयांचा निधी मंजूर



## अखेर शासन निर्णय झाला प्रसिद्ध, शेतकऱ्यांना दिलासा

**मुंबई । प्रतिनिधी**

**जुलै ते ऑक्टोबर २०२४ मध्ये अतिवृष्टी आणि पुरामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना राज्य सरकार सरकारने दिलासा दिला आहे. राज्यातील ६ लाख शेतकऱ्यांसाठी ७३३ कोटी ४५ लाख ८४ हजार रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. याबद्दलचा शासन निर्णय राज्य सरकारने प्रकाशित केला आहे.**

राज्यात नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झाल्यास राज्य सरकार शेतकऱ्यांना निविष्ठा अनुदान स्वरूपात मदत करते, त्यानुसार सदर मदत मंजूर करण्यात आली आहे. यामध्ये राज्यातील पाच विभागातील २२ जिल्ह्यांचा समावेश आहे. राज्य सरकारला विभागीय आयुक्तांकडून वेळोवेळी प्रस्ताव पाठवण्यात आले होते. त्यानुसार कोकण, नागपूर, अमरावती, पुणे आणि नाशिक विभागातील शेतकरी मदतीस पात्र ठरले आहेत. या शेतकऱ्यांना थेट लाभ हस्तांतरण प्रणालीतून बँक खात्यात रक्कम जमा करण्यात येणार आहे. तसेच १ जानेवारी २०२४ च्या शासननिर्णयानुसार जास्तीत जास्त ३ हेक्टरच्या मर्यादेत निधी देण्यात येणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना काहीसा दिलासा मिळू शकतो. राज्यातील नाशिक विभागाला सर्वाधिक ३६३ कोटी ६६ लाख २३ हजार रुपयांची निधी मिळणार आहे. त्यापाठोपाठ अमरावती विभागाला ३२४ कोटी ४७ लाख रुपये मंजूर करण्यात आले आहेत. तर पुणे विभागासाठी १६ कोटी

◀◀ पान २ वर

## उद्यापासून विधिमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन

मुंबई : प्रतिनिधी

राज्य विधिमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सोमवार दि. ३ मार्चपासून मुंबईत सुरू होत असून, विधानसभा निवडणुकीनंतर सत्तेत आलेले मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकार आपला पहिला अर्थसंकल्प या अधिवेशनात मांडणार आहे. विरोधकांचे संख्याबळ फारसे नसले तरी सरकारला अडचणीत आणण्यासाठी अनेक स्फोटक मुद्यांचा दारूगोळा त्यांच्या हाताशी आहे.

सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरण, कृषी साहित्य खरेदीतील कथित भ्रष्टाचार यावरून अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे आणि बनावट कागदपत्रांच्या आधारे मुख्यमंत्री कोट्यातील सदनिका लाटल्यामुळे दोन वर्ष कारावासाची शिक्षा झालेले कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांच्या राजीनाम्याच्या मागणीवर आक्रमक भूमिका घेण्याची तयारी विरोधकांनी केली

◀◀ पान २ वर

# अखेर सत्य बाहेर आलेच; वाल्मिक कराड मास्टरमाईंड

## संतोष देशमुख खून प्रकरण; आरोपपत्रातील घटनाक्रम उघड



**बीड । प्रतिनिधी**

**संतोष देशमुख खुन प्रकरणात मास्टरमाईंड नेमका कोण ? यावरुन आतापर्यंत बरेच वादंग उठले होते. अखेर वाल्मिक कराड हाच संतोष देशमुख यांच्या हत्याकांडातील मास्टरमाईंड असल्याचे सीआयडीने दाखल केलेल्या आरोपपत्रातून समोर आले आहे. सीआयडीने दाखल केलेल्या आरोपपत्रातील घटनाक्रम उघड झाला असून बऱ्याच बाबींचा उलगडा होण्याची शक्यता आहे.**

संतोष देशमुख खून प्रकरण संपुर्ण राज्यात गाजले. अनेक जिल्ह्यात मोर्चे निघाल्याने सरकार सुध्दा ॲक्शन मोडवर आले. शेवटी सीआयडी, एसआयटी आणि न्यायालयीन चौकशी करण्याचे सरकारने आदेश दिल्यावर तपासात गती आली. सीआयडीने दि. २८ फेब्रुवारी रोजी न्यायालयात १५०० पानांचे आरोपपत्र दाखल केले. या आरोपपत्रात नेमके काय असणार? याबाबत सर्वांनाच उत्सुकता होती. शेवटी सीआयडीने दाखल केलेल्या आरोपपत्रातील घटनाक्रम आणि मुद्दे उघड झाले असून बऱ्याच बाबींचा उलगडा झाला आहे. सीआयडीच्या आरोपपत्रात संतोष देशमुख खून प्रकरण, पवनचक्की खंडणी प्रकरण आणि ॲट्रोसिटी प्रकरण हे सर्व एकमेकांशी सलग्न असल्याचे म्हटले आहे. तसेच या आरोपपत्रात वाल्मिक कराड हाच मुख्य सुत्रधार असल्याचे स्पष्ट झाले

◀◀ पान २ वर

### बीड नाही तर पुण्याबद्दल विचारा–पंकजा मुंडे

मी पुण्यात आले आहे. तुम्ही पुण्याचे पत्रकार आहात. पुण्यातले प्रश्न विचारा. पुण्यात त्या मुलीवर बलात्कार झाला. तो प्रश्न का विचारत नाही? नांदेडमध्ये काल अत्याचाराचा प्रकार घडला. संपूर्ण राज्यात असे प्रकार घडत असल्याचे सांगत असताना मंत्री पंकजा मुंडे यांनी पत्रकारांनाच फटकारल्याचे पाहायला मिळाले. तसेच माझा देवेंद्र फडणवीस यांच्यावर पुर्ण विश्वास असून ते लक्ष घालून असल्याचे त्या म्हणाल्या.

### कठोर शिक्षा मिळणार–फडणवीस

संतोष देशमुख हत्या प्रकरणी पोलीस सुरवातीपासून कठोर तपास करीत आहेत. संपूर्ण पुराव्यानिशी न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केला आहे. उज्वल निकम यांची या प्रकरणात सरकारी वकील म्हणून नेमणूक केली आहे. त्यामुळे आरोपींना कठोरता कठोर शिक्षा मिळावी, असा प्रयत्न राहणार आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले आहे.

### वाल्मिकच खरा आका–आ. धस

एसआयटीने जे मांडले ते योग्य आहे. यांच्या हा सूत्रधार जो आहे, वाल्मिक कराड मुख्य सूत्रधार आहे. बाकीचे प्यादे आहेत. एसआयटीने एकत्रित जंत्री केलेली दिसते, अशी प्रतिक्रिया सुरेश धस यांनी दिली. तसेच धनंजय मुंडे यांनी राजीनामा देण्याची मागणीही त्यांनी यावेळी केली.

### धनंजय मुंडेंचा राजीनामा घ्या नाही तर पेटून उठू–दमानिया

धनंजय मुंडे यांच्यासारखी माणसे राजकारणात असली तर अनेक वाल्मिक कराड तयार होतील, तर सोमवारपर्यंत धनंजय मुंडेंचा राजीनामा घेतला नाही तर आम्ही पेटून उठू, असा जाहीर इशारा अंजली दमानिया यांनी दिला आहे.

### गुन्हेगारात दहशत निर्माण होईल अशी शिक्षा द्या–थोरात

बाळासाहेब थोरात म्हणाले की, बीड घटनेप्रकरणात जे जे सहभागी असतील त्यांना अशी कडक शिक्षा झाली पाहिजे की, गुन्हेगाराला दहशतच निर्माण झाली पाहिजे, असे त्यांनी म्हटले आहे.

### आरोपपत्रातील घटनाक्रम

८ ऑक्टोबर २०२४ ला अवदा कंपनीचे अधिकारी शिवाजी थोपटेंना कराडने परळीच्या कार्यालयात बोलावले, कंपनी चालू ठेवायची असेल तर दोन कोटी द्या, अन्यथा अवदा कंपनीची बीड जिल्ह्यातील कामं बंद करा अशी धमकी कराड विष्णू चाटेच्या समोर थोपटेंना दिली.

२९ नोव्हेंबरला कराडने चाटेच्या फोनवरून अवादा कंपनीच्या सुनील शिंदेंना काम बंद करण्याची पुन्हा धमकी दिली. त्याच दिवशी सुदर्शन घुलेने कंपनीत जाऊन धमकी दिली.

२९ नोव्हेंबरलाच कराड, चाटे, सुदर्शन घुले, प्रतिक घुले, सुधील सांगळे आणि कृष्णा आंधळेने केजच्या कार्यालयात मिटिंग घेऊन कट रचला

६ डिसेंबर २०२४ ला घुले आणि सांगळेने कंपनीत जाऊन सुरक्षा रक्षकाला मारहाण केली. दोन कोटी द्या, नाहीतर कामं बंद करा अशी धमकी दिली.

कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी मस्साजोगचे सरपंच देशमुखांना फोन केला, देशमुखांनी घुलेला कंपनी बंद करू नकोस लोकांना रोजगार मिळू द्या, अशी विनंती केली. सुदर्शन घुलेने त्यावेळी देशमुखांना सरपंच तुला बघून घेऊ, जीवंत सोडणार नाही अशी धमकी दिली.

त्यानंतर विष्णू चाटे, देशमुखांना वारंवार खंडणीच्या आड येऊ नको, वाल्मिक अण्णा तुला जीवंत सोडणार नाही अशी धमकी देत होता.

सात डिसेंबर २०२४ ला सुदर्शन घुलेने वाल्मिक कराडला फोन केला, कराडने घुलेला सांगितलं, जो तो उठेल आपल्या आड येईल, आपण भिकेला लागू,

◀◀ पान २ वर

# फडणवीस सरकार ॲक्शन मोडमध्ये

## तानाजी सावंतांनी काढलेले ६ हजार कोटीचे टेंडर रद्द; चौकशी होणार





**मुंबई । प्रतिनिधी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सरकार आता माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सरकारमधील आणखी एका निर्णयाची चौकशी करणार असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सरकार एकनाथ शिंदे सरकारच्या काळातील तत्कालीन आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांनी काढलेले ६ हजार कोटीचे स्वच्छतेचे टेंडर रद्द केले असून आरोग्य विभागाच्या या निर्णयाची चौकशी होणार आहे. लवकरच येत्या काही दिवसांमध्ये मुख्यमंत्र्यांकडून आरोग्य विभागाने घेतलेल्या निर्णयांचा आढावा घेणार

◀◀ पान २ वर

### पोलीस असो की अधिकारी या गुन्ह्यात सापडला तर थेट बडतर्फ

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील पोलीस यंत्रणेला मोठा इशारा दिला आहे. ड्रग्सच्या केसमध्ये कोणत्याही पदावरील पोलीस अधिकारी आढळून आला तर त्याच्यावर निलंबनाची कारवाई होणार नाही. त्याला थेट बडतर्फ केले जाईल, त्यासंदर्भात अशा सूचना दिल्या आहेत, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले आहे.

# अजित पवार यांच्या नेतृत्वात बीड जिल्ह्याचा कायापालट होईल

## डॉ.योगेश क्षीरसागर यांचे प्रतिपादन; बीडमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची सदस्य नोंदणी सुरू



**बीड । प्रतिनिधी**

**अजितदादा पवार यांच्याकडे बीड जिल्ह्याचे पालकत्व असून आता जिल्ह्याचा कायापालट होईल. त्यांच्या नेतृत्वाखाली पक्ष संघटन देखील मजबूत केले जात आहे. जिल्ह्यात बीड विधानसभा मतदारसंघातून सर्वाधिक सदस्य नोंदणी करावी, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केले आहे.**

बीडमध्ये के.एस.के. महाविद्यालयाच्या सभागृहात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सदस्य नोंदणी अभियानाची सुरुवात शनिवारी (दि.१) करण्यात आली. याप्रसंगी डॉ.योगेश क्षीरसागर हे बोलत होते. व्यासपीठावर पक्षाचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. पुढे बोलताना डॉ.योगेश क्षीरसागर म्हणाले, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्य अविरत सुरू आहे. बीड लोकसभा आणि विधानसभा मतदारसंघाचे निवडणुकीचे निकाल अनपेक्षित लागले.

◀◀ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१ मार्च २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| आवक | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: २०९.०० क्विंटल | २,२०० | ३,११७ | २,८४८ |
| ज्वारी/हायब्रिड: १३६.५० क्विंटल | १,७०० | ३,८१० | २,५४२ |
| मका/लोकल:५.०० क्विंटल | २,२०१ | २,२०१ | २,२०१ |
| तूर :४८.५० क्विंटल | ६,५५१ | ७,२८५ | ७,०६४ |
| उडीद : ७.५० क्विंटल | ५,१०० | ५,१०० | ५,१०० |
| बाजरी: २.५० क्विंटल | २,८६५ | २,८६५ | २,८६५ |
| मुग :४.५० क्विंटल | ६,५०१ | ७,४५१ | ६,९७६ |
| सोयाबीन: १५१.०० क्विंटल | ४,००० | ४,०५० | ४,०३० |
| हरभरा: १५.०० क्विंटल | ५,२०० | ७,१७५ | ६,१८७ |

## ८ मार्चपासून मणिपूरचे सगळे बंद रस्ते खुले करण्याचे आदेश

**नवी दिल्ली। वृतसंस्था**

मणिपूरमधील सुरक्षा व्यवस्थेचा आढावा बैठक शनिवारी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी घेतली. यावेळी त्यांनी ८ मार्चपासून मणिपूरमधील सर्व रस्त्यांवर लोकांची सुरळीत वाहतूक सुनिश्चित करण्याचे निर्देश दिले. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी मणिपूरच्या सुरक्षा परिस्थितीबाबत बैठकीचे अध्यक्षस्थान भूषवले. यावेळी त्यांनी राज्यातील सुरक्षा व्यवस्थेचा आढावा घेतला. ८ मार्चपासून मणिपूरमधील सर्व मार्गांवर मुक्तपणे सार्वजनिक हालचाली

◀◀ पान २ वर

# बीडमध्ये जीएसटी घोटाळा उघड ; मजुरांची फसवणूक

## बनवट खाते उघडल्या प्रकरणी आरोपीवर गुन्हा दाखल




**बीड। प्रतिनिधी**

गेल्या काही दिवसापासून बीड जिल्हा वेगवेगळ्या कारणामुळे चर्चेत आहे. कधी पिक विमा तर कधी खून प्रकरण प्रकाश झोतामध्ये येत असतानाच बीडमध्ये जीएसटीचा मोठा घोटाळा उघड होण्याची दाट शक्यता आहे. शहरातील एका मजूराची फसवणूक करून त्याच्या कागदपत्राच्या आधारे जीएसटीचे बनावट खाते उघडल्याचा प्रकार बीडमध्ये घडला आहे. याप्रकरणी सदर मजूराच्या फिर्यादीवरून आरोपीविरोधात पेठ बीड ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गेल्या काही दिवसापासून बीड जिल्हा हा

◀◀ पान २ वर

# महिला, मुलांवरील गुन्हे रोखण्यासाठी प्लॅटफॉर्म तयार करणार !

## वरिष्ठ पोलीस अधिकारी परिषदेत मुख्यमंत्री फडणवीस यांची घोषणा



**मुंबई । प्रतिनिधी**

**केंद्राच्या कायद्यात शक्ती कायद्यासंदर्भातील अनेक तरतूदी आहेत. त्यामुळे या कायद्यात आणखी काही बदल करता येतो का? हे पाहावे लागणार आहे. केंद्र सरकारने जो नवीन कायदा केला आहे. त्यात शक्ती कायद्यातील अनेक तरतुदी आधीपासून आहेत, त्यामुळे या संदर्भातील नवीन कायदा आपल्याला करावा लागेल, अशी माहिती मुख्यमंत्री, गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी (दि.१) पत्रकारांशी बोलताना दिली.**

ठाण्यात शनिवारी झालेल्या वरिष्ठ पोलीस अधिकारी परिषद–२०२५ मध्ये विविध विषयांवर चर्चा झाली. विशेषत: तीन नवीन कायदे पारित झालेले आहेत. त्या कायद्यांचे महाराष्ट्रातील अंमलबजावणी संदर्भात सादरीकरण करण्यात आले. त्यानंतर मुख्यमंत्री फडणवीस यांनी पत्रकारांशी संवाद साधला. ते पुढे म्हणाले की, तीन नव्या कायद्याबाबत चर्चा करण्यात आली आहे. यावेळी सायबर गुन्हे

◀◀ पान २ वर

## बीडमुळे अजित पवारांच्या राष्ट्रवादीची राज्यात अपरिमित हानी होणार–आ.धस



**बारामती । प्रतिनिधी**

**बीडमधील संवेदनशील प्रकरणांमुळे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादीची केवळ बीड जिल्ह्यापुरतीच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रात अपरिमित हानी होवू शकते, असे मत भाजपचे आमदार सुरेश धस यांनी व्यक्त केले.**

बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर मंत्री धनंजय मुंडे यांच्या राजीनामाच्या मागणीचा जोर वाढत असतानाच भाजप आमदार सुरेश धस यांनी बारामतीत केलेल्या या विधानामुळे आता नव्याने चर्चा सुरु झाली आहे. धस हे शनिवारी (दि. १) फलटण दौऱ्यावर जात असताना बारामतीत पत्रकारांशी बोलत होते.

◀◀ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# भाजपमधील अंतर्गत खदखद धोकादायक

महाराष्ट्र, हरियाणा, राजस्थान, मध्य प्रदेश आणि मणिपूर या राज्यांमध्ये काही समान सूत्र आहेत. एक या सर्व राज्यांमध्ये मणिपूरचा आताचा अपवाद वगळता भारतीय जनता पार्टीचे सरकार आहे, तर दुसरे या राज्यांमध्ये भाजपअंतर्गत मतभेद आहेत. यातील महाराष्ट्राबाबत बोलायचे झाले तर पक्षांतर्गत मतभेद जाहीरपणे समोर आले नसले तरी आता कुजबुज असल्याचे सत्तेच्या वर्तुळात फेरफटका मारल्यावर कळते. तथापि, युतीतील उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यात फारसे सख्य नसल्याचे दिसते.

स्वत: शिंदेंनी कोणतेही कोल्ड वॉर नसल्याचे सांगितले असले तरी त्यांनीच असेही सांगितले की 'मला हलक्यात घेऊ नका'. हा इशारा उद्धव ठाकरे यांना असावा असा काहींचा कयास असेल. प्रत्यक्षात देवेंद्र फडणवीस यांना तो इशारा असल्याचे जाणकारांचे म्हणणे आहे. वर उल्लेख केलेल्या राज्यांमधील काही बातम्या गेल्या महिना-दोन महिन्यांत हेच सूचित करत आहेत की, भाजप बलाढ्य पक्ष झाला असला आणि वरून सर्व काही ठिकठाक दिसत असले तरी दिसते तसे नाही. पक्षाच्या संदर्भात जे काही संकेत मिळत आहेत त्यांची काँग्रेस पक्षाच्या इतिहासाशी तुलना केली तर भाजपमध्ये हे फार झटपटच होते आहे असे वाटते. काँग्रेसच्या सुरुवातीच्या टप्प्यात पंडित नेहरूंसारखा मोठा नेता असल्यामुळे त्यांना प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष आव्हान देणे सोडाच, स्वप्नातही आव्हान देण्याचे कोणाचे धारिष्ट्य नव्हते. जे त्यांचे तेच इंदिरा गांधींच्या काळात होते. वास्तविक इंदिराजींना काही आव्हाने देण्याचा प्रयत्न झाला. त्यातले अनेक नंतर काँग्रेसच्या मूळ प्रवाहात म्हणजे इंदिरा गांधींच्या नेतृत्वाखाली नाक घासत परत आले. जे आले नाहीत ते राजकीय वनवासात गडप झाले. राजीव गांधी यांना तुलनेने कमी काळ लाभला व त्यात त्यांचा वरचष्मा राहिला. सोनिया गांधीही जेव्हा काँग्रेसच्या केंद्रस्थानी होत्या तेव्हा त्यांच्या अथॉरिटीला आव्हान नव्हते. २०१४ चा पहिला पराभव आणि २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत त्याची झालेली पुनरावृत्ती यानंतर काँग्रेसला ओहोटी लागण्यास सुरुवात झाली. गांधी हे आडनाव आपल्याला सत्तेपर्यंत पोहोचवू शकत नाही असा साक्षात्कार झालेल्यांनी पक्षाला रामराम करण्यास आणि त्याही पलीकडे फर्स्ट फॅमिलीवर तोफ डागण्यास सुरुवात केली. गल्लीपासून दिल्लीपर्यंत काँग्रेस होती त्या काळात म्हणजे २०१९ किंवा अगदी २०२२-२४ पर्यंत म्हटले तरी चालेल काँग्रेसमध्ये तो एक दरारा होता आणि आजही तो कायम असल्याचे अनेक ठिकाणी दिसून येते. त्या तुलनेत भाजपात आताच विसंवादाच्या दिशेने प्रवास सुरू झाला आहे की काय अशी शंका यावी अशा घटना घडू लागल्या आहेत. महाराष्ट्रात जे काही चालले आहे ते जाणकारांच्या नजरेतून सुटले असावे असा भाजप नेत्यांचा कदाचित समज झालेला असू शकतो. वस्तुस्थिती मात्र तशी नाही. गेल्या पाच वर्षांत महाराष्ट्रात ज्या घडामोडी घडल्या त्यातून राज्यातील जनता अधिक राजकीय साक्षर झाली आहे. शिंदे काहीही म्हणत असले आणि मुळात ते काहीतरी म्हणत आहेत यातच वेगळा वास येतो व त्याचे उगमस्थान दिल्ली असल्याचे दिसते. ज्या महाशक्तीची भलावण शिंदेंनी पूर्वी केली होती ती महाशक्ती पंतप्रधान नरेंद्र मोदी नाहीत कारण त्यांचे व्याप वेगळे आहेत. त्या स्थितीत त्यांनी पक्षाची सूत्रे ज्यांच्याकडे सोपवली होती किंवा आहेत त्या अमित शहांकडेच सगळी बोटे जातात. २०१४ ते २०२४ हा भाजपचा दहा वर्षांचा कालखंड पाहिला तर भारतीय राजकारणावर त्यांनी निर्विवाद वर्चस्व राखले आहे. काही अपवाद वगळता बहुतेक ठिकाणी भाजप घट्ट पाय रोवून उभा आहे. कोणाच्या नेतृत्वामुळे आणि कोणाच्या कथित मायक्रो मॅनेजमेंटमुळे पक्षाचा प्रभाव वाढला असेल आणि यश मिळत असेल तर सहसा त्या नेत्याला आव्हान देण्याचे धारिष्ट्य दाखवले जात नाही. मात्र, महाराष्ट्रातच नव्हे तर उत्तर प्रदेश, कर्नाटक, राजस्थान, मध्य प्रदेश आणि मणिपूरमध्येही ते दाखवले जाते आहे. एका रात्रीत राज्याचा मुख्यमंत्री बनवण्याची ताकद असणाऱ्या शहांकडेच सगळी सूत्रे केंद्रित झाली आहेत याचाच हा परिपाक आहे की लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर जे. पी. नड्डा यांनी केलेल्या विधानानंतर पुन्हा आपली ताकद सिद्ध करत भाजपची मातृसंघटना भाजपच्या कर्त्यांना त्यांच्या शक्तीची जागा दाखवून देत आहे? उत्तर प्रदेशातील पहिल्या योगी राजवटीत अधिकाऱ्यांपासून प्रमुख नियुक्त्यांचे निर्णय दिल्लीतूनच घेतले गेले. आता योगी स्वत:च निर्णय घेऊ लागले आहेत. महाराष्ट्राच्या संदर्भात कथित दिलजमाईसाठी फडणवीस आणि शिंदेंची बैठक अलीकडेच दिल्लीत झाल्याचे म्हणतात. तथापि, त्यानंतरही फडणवीसांनी शिंदे सरकारच्या अगोदरच्या सर्व निर्णयांची छाननी सुरू केली आहे. त्यामुळे 'मला हलक्यात घेऊ नका' असे इशारेवजा वक्तव्य करण्यात आल्याचे म्हटले जाते. कर्नाटकात येडियुरप्पा आणि त्यांच्या प्रदेशाध्यक्ष पुत्राच्या विरोधात उघड संघर्षाचा पवित्रा घेतला गेला आहे. सबुरीचा सल्ला देऊनही कोणीही केंद्रीय नेतृत्वाचे ऐकण्याच्या मनस्थितीत नाही. मध्य प्रदेशात शिवराजसिंह चौहान यांचा स्वत:चा प्रभाव होता. पर्रिकरांसारखे त्यांनाही दिल्लीत बळजबरीने बोलावले गेले; पण त्या राज्यात आज भाजपचेच नेते पक्षाला अडचणीत आणणारे आरोप आपल्या सरकारवर करत आहेत. मणिपूरमध्ये वादग्रस्त मुख्यमंत्र्यांचे संरक्षण करणे अशक्य झाल्यावर पुढील नेता निवडीसाठी एकमत होऊ न शकल्यामुळे राष्ट्रपती राजवट लादावी लागली. राजस्थानातही ज्येष्ठ नेते फोन टॅपिंगच्या मुद्द्यावरून आपल्याच पक्षावर बाण सोडत आहेत. दिल्ली, हरियाणा, महाराष्ट्र या राज्यांत प्रचंड विजय मिळवूनही जर केंद्रीय नेतृत्वाला आव्हान दिले जात असेल तर भाजपला हा शुभ संकेत नाही. काँग्रेसला जे सत्तर वर्षांनी भोगावे लागले ते भाजप एवढा वेळ घेणार नाही हाच यातला अर्थ.

# सहाय्यक पोलीस निरीक्षकनी लाच घेताना पोलीस प्रशासनामध्ये बदनामी थांबली पाहिजे

जालना। प्रतिनिधी

**तक्रारदार रा.राजा टाकळी ता.घनसावंगी जिल्हा जालना आरोपी लोकसेवक सचिन इंगेवाड, सहायक पोलिस निरीक्षक, पोलीस ठाणे आष्टी ता.परतूर जी.जालना मूळ रा.वाघाळ, पोस्ट सिडको ता.जी.नांदेड ह. मु. कडपे पेट्रोल पंप जवळ, मोंढा टी पॉईंट आष्टी . याप्रकरणी ज्येष्ठ सेवानिवृत्त पोलीस उपाधीक्षक श्री चंद्रकांत दिलपाक यांना विचारले असता ते म्हणाले की पैसे घेण्याच्या आमिषाला बळी पडू नये व पोलीस प्रशासनामध्ये बदनामी थांबली पाहिजे अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली.**

गोकुळदास देवळे, वय ३७ वर्ष, पोलिस शिपाई, ब. न.१६५५, ने. पोलिस ठाणे आष्टी ता.परतूर जी.जालना रा.जायकवाडी वसाहत, आष्टी ता.परतूर जी.जालना (वर्ग -३) विष्णू कुरदणे, वय ३२ वर्ष, व्यवसाय शेती, रा.पांडे पोखरी, ता.घनसावंगी, (खाजगी इसम) तक्रारीचे स्वरूप:- तक्रारदार यांचे ताब्यातील टिपर क्रमांक -३७ -२०१८ चे अनुषंगाने तक्रारदार यांचा भाऊ व इतर यांचे विरुद्ध पोलिस ठाणे आष्टी ता.परतूर येथे गु. र. न. ३१/२०२५ कलम ३, ४ खाण आणि खनिज अधिनियम सह कलम १३२, २२१, २८१, ३(५), ३०३ (२) भारतीय न्याय संहिता प्रमाणे गुन्हा दाखल असून श्री.इंगेवाड व श्री.देवळे हे खाजगी इसम कुरदणे यांचे मार्फतीने सदर गुन्ह्यातील टिपर सोडण्यास मदत करणे, तक्रारदार यांचे भावाचे जमीनास मदत करण्यासाठी १५००००/ रु ची मागणी करीत आहेत. तक्रारदार यांनी द २८ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बीड येथे समक्ष हजर येऊन लिखित तक्रार दिली होती. त्या अनुषंगाने दिनांक ०१ मार्च रोजी तक्रारदार व पंच क्र, १ यांना पोलिस ठाणे आष्टी येथे पाठवून लाच मागणी पडताळणी केली असता, श्री.देवळे यांनी तक्रारदार यांच्याकडे पैशाची मागणी केली.तसेच श्री.इंगेवाड यांनी तक्रारदार यांना श्री. देवळे यांना सांगितलं आहे असे म्हणून श्री. देवळे यांना लाच रक्कम मिळवण्यास प्रोत्साहन दिले. तसेच खाजगी इसम श्री. कुरदणे यांनी तक्रारदार यांच्याकडे श्री.इंगेवाड व श्री.देवळे यांच्याकरिता लाचेची मागणी करून तडजोड अंती एक लाख ८० हजार रु स्वतः स्वीकारण्याचे मान्य केले. यातील खाजगी इसम कुरदणे यांनी ०१ मार्च रोजी तक्रारदार यांचेकडून एक लाख ८० हजार रुपये सई लस्सी सेंटर, लहुजी चौक, आष्टी ता.परतूर येथे पंचासमक्ष स्वतः स्वीकारली असता यांना लाचेच्या रकमेसह रंगेहात पकडले आहे. खाजगी इसम कुरदणे यांचेकडून लाच रक्कम जप्त करण्यात आली आहे. लोकसेवक श्री.इंगेवाड, श्री.देवळे व खाजगी इसम श्री कुरदणे यांचे विरूद्ध गुन्हा दाखल करून त्यांना गुन्ह्यात अटक करण्याची तजवीज ठेवली आहे. याप्रकरणी श्री. इंगेवाड, श्री.देवळे व खाजगी इसम श्री.कुरदणे यांचे पोलिस ठाणे आष्टी येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून आरोपीला अटक करून तपास करण्याची तजवीज ठेवण्यात आली आहे. सापळा अधिकारी श्री.शंकर शिंदे, पोलिस उप अधीक्षक, बीड युनूस शेख, पोलिस निरीक्षक.बीड सापळा पथकातील श्रीराम गिराम, भरत गारदे, सफौ सुरेश सांगळे , हनुमान गोरे , संतोष राठोड, अमोल खरसाडे, अविनाश गवळी चालक अंबादास पुरी मार्गदर्शक अधिकारी संदीप आटोळे,पोलीस अधीक्षक छत्रपती संभाजी नगर, श्री.मुकुंद आघाव,अप्पर पोलीस अधीक्षक छत्रपती संभाजी नगर

# गोवंशाचे रक्षण; पंकजाताई मुंडेंच्या उपस्थितीत कायदेतज्ज्ञांचे चर्चासत्र

पुणे । प्रतिनिधी

राज्याच्या पर्यावरण व वातारणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत आज पुण्यात पशुसंवर्धन विभागा अंतर्गत गोवंश रक्षण आणि संवर्धन कायद्याबाबत एक दिवसीय चर्चासत्र पार पडले. कायद्यात करण्यात येणाऱ्या सुधारणांविषयी त्यांनी कायदेतज्ज्ञ आणि अधिवक्त्यांशी यावेळी संवाद साधला.

महाराष्ट्र गोसेवा आयोग आणि पशुसंवर्धन विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित गोवशांचे रक्षण आणि संवर्धन कायदा संदर्भात



राज्यातील प्रमुख कायदेतज्ज्ञ अधिवक्ता यांच्या प्रमुख उपस्थितीत औंध येथे एक दिवसीय चर्चा सत्र पार पडले. राज्यातील गोवंशाचे रक्षण आणि संवर्धनाबाबत माहिती जाणून घेत ना. पंकजाताईंनी याबाबतचे कायदे व त्यात करण्यात येणाऱ्या नवीन सुधारणा याबद्दल कायदे तज्ज्ञांच्या सोबत संवाद साधला. मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश अंबादास जोशी, महाराष्ट्र गोसेवा आयोगाचे अध्यक्ष शेखर मुंदडा, विश्वाहिंदू परिषदेचे कृष्णकांतजी कुदळे तसेच पशुसंवर्धन विभागाचे अधिकारी यावेळी उपस्थित होते. याप्रसंगी महाराष्ट्र गोसेवा आयोगाच्या मुख्यालयास त्यांनी सदिच्छा भेट दिली. पशुवैद्यकीय विभागाने शेतकऱ्यांना घरपोच सेवा उपलब्ध करून देण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या हेल्पलाईन सेंटरचे उद्घाटन ना. पंकजाताई मुंडे यांनी आज येथे केले.१९६२ महापशुधन संजीवनी या हेल्पलाईन मुळे शेतकरी बांधवांना आपल्या पशुधनांसाठी घरपोच वैद्यकीय सेवा उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. यावेळी सुपर स्पेशालिटी पशुवैद्यकीय हॉस्पीटल आणि बायो सेक्युरीटी आयव्हीबीपी लॅबला त्यांनी भेट देऊन कामकाजाची पाहणी केली.

# जालन्यातील खराब रस्त्यांबाबत हायकोर्टाचा दणका; महानगर पालिकेला बजावली नोटीस

जालना । प्रतिनिधी

**जालना शहरातील रस्त्याच्या समस्या बाबत महेश धन्नावत यांनी दाखल केली जनहित याचिका; पुढील सुनावणी १९ मार्चला होणार आहे. शहरातील दयनीय अवस्था झालेल्या खड्डेमय रस्त्यांमुळे नागरिकांच्या होणाऱ्या हालाकीची गंभीर दखल घेत, मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने जालना महापालिका, , जिल्हाधिकारी आणि इतर संबंधित अधिकाऱ्यांना नोटीस जारी केली आहे. ही जनहित याचिका महेश धन्नावत यांनी रूपेश जायसवाल यांच्यामार्फत सादर केली असून, त्यात खराब रस्ते, उघडे मॅनहोल याकडे लक्ष वेधण्यात आले आहे.**

न्यायमूर्ती मंगेश पाटील आणि प्रफुल्ल खुबलकर यांच्या खंडपीठाने संबंधित अधिकाऱ्यांकडून याबाबत स्पष्टीकरण मागवल्याने या गंभीर नागरी समस्यांवर आता प्रशासनाला उत्तर द्यावे लागणार असून, पुढील सुनावणी १९ मार्च रोजी होणार आहे. याचिकाकर्ते महेश धन्नावत यांनी आपल्या याचिकेत नमूद केले आहे की, शहरातील रस्त्यांची अवस्था अत्यंत दयनीय असून, खड्डे आणि उघडे मॅनहोल यामुळे शाळकरी मुले, पादचारी आणि वाहनचालकांचे मोठे हाल होत आहेत. त्यांनी न्यायालयाकडे मागणी केली आहे की, रस्त्यांची दुरुस्ती टिकाऊ आणि योग्य सामग्रीने केली जावी, जेणेकरून रस्त्यांची गुणवत्ता कायम राहील आणि नागरिकांना सुरक्षित प्रवास करता येईल. जलवाहिनी, सांडपाणी निःसारण पाईप आणि केबल वायर टाकण्यासाठी अनेक रस्त्यांची खोदकामे झाली. मात्र, काम पूर्ण झाल्यानंतर रस्ते पूर्ववत करण्याकडे प्रशासनाने दुर्लक्ष केले. परिणामी, नागरिकांच्या सुरक्षिततेला गंभीर धोका निर्माण झाला आहे, असे नमूद करून याचिकेत शहरातील अनिल जिंदल स्कूलकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्याचा विशेष उल्लेख करण्यात आला आहे. हा रस्ता अत्यंत खराब अवस्थेत असून, विद्यार्थ्यांसह नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. शहरातील अनेक अंतर्गत रस्त्यांची परिस्थितीही वाईट असून, ते अद्याप दुरुस्त करण्यात आलेले नाहीत. यामुळे वाहनचालकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. याचिकेत शहरातील रस्त्यांवरील वाढत्या अतिक्रमणाचा मुद्दादेखील उपस्थित करण्यात आला आहे. यामुळे वाहनचालकांना मोठ्या अडचणी येत असून, शहरात वाहतूक कोंडीचे प्रमाण वाढले आहे. विशेषतः शाळा परिसरातील रस्त्यांवर वाहनांची प्रचंड गर्दी होत असल्याने विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. याचिकाकर्त्यांनी न्यायालयात असा युक्तिवाद केला की, महापालिकेच्या निष्काळजीपणामुळे नागरिकांचे मूलभूत हक्क (अनुच्छेद २१) धोक्यात आले आहेत. वारंवार तक्रारी करूनही महापालिका आणि संबंधित अधिकाऱ्यांनी कोणतीही ठोस कारवाई केलेली नाही, त्यामुळे न्यायालयाच्या हस्तक्षेपाची आवश्यकता भासली. हायकोर्टाने महापालिका आणि महाराष्ट्र सरकारला नोटीस जारी केली आहे. त्यामुळे या गंभीर नागरी समस्यांवर आता प्रशासनाला उत्तर द्यावे लागणार आहे.

# काँग्रेस विधिमंडळ पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या जाहीर

## विधानसभा मुख्य प्रतोदपदी अमित देशमुख, विधान परिषद गटनेतेपदी सतेज पाटील

मुंबई । प्रतिनिधी



अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्या मान्यतेने काँग्रेस विधिमंडळ पक्ष पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. विधानसभेतील काँग्रेसच्या उपनेतेपदी आ. अमीन पटेल यांची, मुख्य प्रतोदपदी माजी मंत्री आ. अमित देशमुख यांची, सचिवपदी आ. डॉ. विश्वजीत कदम यांची आणि प्रतोदपदी शिरीषकुमार नाईक व संजय मेश्राम यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. तर विधानपरिषदेत गटनेतेपदी आमदार सतेज ऊर्फ बंटी पाटील, मुख्य प्रतोदपदी आ. अभिजीत वंजारी आणि प्रतोदपदी राजेश राठोड यांची नियुक्ती करण्यात आल्याची माहिती महाराष्ट्र काँग्रेस प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी दिली आहे. विधिमंडळात काँग्रेस पक्षाच्या आमदारांची संख्या कमी झाली असली तरी उत्साह व ऊर्जा कायम असून जनतेच्या हिताचे प्रश्न सभागृहात मांडून त्यांना न्याय देण्याचा प्रयत्न काँग्रेस पक्ष करेल. सत्ताधारी पक्षाला जाब विचारण्यासाठी पक्षाचे नवे शिलेदार महत्वाची भूमिका बजावतील'' असे सांगून प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. काँग्रेसच्या विधिमंडळाच्या निवडीत पहिल्यांदाच काही जून्या आणि परंतु तरूण आमदारांवर जबाबदारी सोपविण्यात आली आहे. त्यामुळे काँग्रेसची परंपरागत टीम कशा पद्धतीने विधिमंडळात काम करते हे पाहणे उत्सुकतेचा विषय ठरणार आहे. त्याचबरोबर परंपरागत नेते बाळासाहेब थोरात, आणि इतर नेत्यांना मात्र या प्रक्रियेपासून लांब ठेवण्यात आले आहे. विधानसभेत विलासराव देशमुख यांचे सुपुत्र अमित देशमुख यांच्यावर पहिल्यांदाच जबाबदारी सोपविण्यात आली आहे. तर सतेज बंटी पाटील हे वास्तविक पाहता राज्याच्या प्रदेशाध्यक्ष पदाच्या शर्यतीत होते. मात्र आता त्यांच्यावर विधान परिषदेच्या गटनेते पदाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

# मॉडेल इंग्लिश स्कूलमध्ये मराठी भाषा गौरव दिन साजरा

कळंब । प्रतिनिधी

**शहरातील मॉडेल इंग्लिश स्कूल मध्ये मराठी भाषा दिन विविध उपक्रम राबवून साजरा करण्यात आला. यावेळी कवी कुसुमाग्रजांच्या फोटोस पुष्पहार अर्पण करून दीपप्रज्वलन करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून उद्योजक विठ्ठल माने उपस्थित होते तर प्रमुख पाहुणे म्हणून बालकवी अश्रुबा कोठावळे कवी सोपान पवार, प्राचार्या लता यंदे उपस्थित होते. पाहुण्यांचे स्वागत मॉडेल इंग्लिश स्कूलचे पोपट लोमटे यांनी स्वागत गीत गाऊन स्वागत केले.**



या कार्यक्रमाचे प्रास्ताविक संयोजक शुभांगी पालकर यांनी केले. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांनी केलेले मराठी भाषेतील विविध प्रयोग , वेगवेगळे बॅनर, फलक प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीत सादर करण्यात आले. त्याच पद्धतीने मराठी भाषेमध्ये विद्यार्थ्यांनी पैकी यज्वान पाटील ,चैत्राली गायकवाड ,स्वराली पाटील या विद्यार्थ्यांनी अतिशय उत्कृष्ट असे मराठी भाषेत भाषणे केली. यावेळी अध्यक्ष विठ्ठल माने यांनी आपल्या भाषणात म्हणाले की मराठी भाषा किती प्रगल्भ आहे ,मराठी भाषेचे महत्त्व सांगितले , शाळेचे देखील कौतुक केलं , आणि विद्यार्थ्यांनी मराठीतून बोललं पाहिजे , मराठी भाषेची अविट अशी गोडि आहे हे देखील त्यांनी विद्यार्थ्यांना समजून सांगितलं त्यासोबतच श्री.आश्रुबा कोठावळे यांनी आपल्या भाषणामध्ये बोलताना 'जोंधळ' ही कविता सादर केली. विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त असा सहभाग घेत विद्यार्थ्यांना स्वतःच्या कवितेमध्ये सामावून घेत एकापेक्षा एक सरस अशा सुंदर कविता त्यांनी सादर केल्या. त्यासोबतच विद्या भवन माध्यमिक शाळेचे श्री. सोपान पवार यांनी आपल्या भाषना मध्ये मराठी भाषेचे महत्त्व सांगितले , मराठी भाषा किती महान आहे हे सांगितले मराठी भाषेची थोरवी सांगितली. यावेळी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते मराठी भाषा गौरव दिन या निमित्त घेण्यात आलेल्या श्रुतलेखन स्पर्धेत प्रथम , द्वितीय आलेल्याअशा विद्यार्थ्यांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले.कार्यक्रमाचे आभार बाळासाहेब मुळे यांनी आभार मानले या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी इत्यादींनी मेहनत घेतली.

पान १ वरून...

### उद्यापासून विधिमंडळाचे

आहे. पुणे स्वारगेट बलात्कार प्रकरण व दोन मंत्र्यांची बेताल वक्तव्ये, लाडकी बहिण योजनेतील ९ लाख बहिणींना अपात्र ठरवणे, २१०० रुपये मानधन देण्याच्यावश्वासाची पूर्तता या मुद्द्यांवरही सरकारला घेरण्याची विरोधकांची रणनीती आहे. यामुळे हे अधिवेशन गाजणार अशी चिन्हे आहेत. दुसरीकडे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महायुती सरकारनेही विरोधकांच्या प्रत्येक हल्ल्याला प्रत्युत्तर देण्याची चोख तयारी केली आहे.

-------------

### अतिवृष्टी- पुरग्रस्त शेतकऱ्यांना

२ लाख ४ हजार, नागपूर विभागासाठी २४ कोटी १४ लाख २५ हजार रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. तर जिल्हानिहाय बुलढाणा जिल्ह्यात सर्वाधिक ३०० कोटी ३५ लाख रुपये, नाशिक जिल्ह्यात १९३ कोटी ७ लाख ८ रुपये, जळगाव जिल्ह्यासाठी सर्वाधिक १४४ कोटी ८९ लाख ९ हजार रुपये, अकोला जिल्ह्यासाठी २२ कोटी ७३ लाख तर वर्धा जिल्ह्यासाठी ११ कोटी ७६ लाख, पालघर जिल्ह्यासतही ९ कोटी ६७ लाख रुपये मंजूर करण्यात आले आहेत. तसेच धुळे जिल्ह्यासाठी ९ कोटी १९ लाख ३६ हजार रुपये, नागपूरसाठी १० कोटी आण, गडचिरोलीसाठी २ कोटी ३९ लाख ७९ हजार रुपये, यवतमाळसाठी ४८ लाख रुपये, सांगली जिल्ह्यात ८ कोटी ५ लाख रुपये, पुणे जिल्ह्यासाठी २ कोटी ६० लाख रुपये तर ठाणे ३ लाख २ हजार, रायगड ३ लाख २५ हजार रुपये रत्नागिरी १ लाख २१ हजार आणि सिंधुदुर्ग ५ लाख २ हजार रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

-------------

### अखेर सत्य बाहेर आलेच;

असून विष्णु चाटे हा क्रमांक दोनचा आरोपी असल्याचे दिसते. त्यामुळे या आरोपपत्रात एकूण ८ आरोपी असून वाल्मिक कराडचे पाय आता आणखी खोलात गेले आहेत.

---------------

### आरोपपत्रातील घटनाक्रम

कोणतीही कंपनी आपल्याला खंडणी देणार नाही. त्यामुळे जो कुणी आड येईल त्याला आडवा करावा लागेल, कामाला लागा, विष्णू चाटेशी बोला तो तुम्हाला मदत करेल. आठ डिसेंबरल २०२४ ला चाटे घुले आणि अन्य चांदुर फाट्याजवळील हॉटेल तिरंगा इथं भेटले, त्यावेळी घुलेने कराडचा निरोप दिला. संतोष देशमुख आडवा आला तर त्याला कायमचा धडा शिकवा, आमच्या मागण्या पूर्ण केल्या नाही तर काय परिणाम होतात, हा संदेश इतरांना जाऊ द्या, असा निरोप दिला. ९ डिसेंबरला दुपारी तीन वाजून २२ मिनिटांनी आरोपींनी संतोष देशमुख यांची गाडी अडवून अपहरण केले. त्यानंतर लोखंडी रॉड, गॅस पाईप, क्लच वायर आणि काठीने संतोष देशमुख यांचा मारहाण करत त्यांचा खून केला. संध्याकाळी ६.३० वाजता देशमुखांचा मृतदेह दैठाण फाट्याजवळ टाकून आरोपी पळून गेले.

----------

### अजित पवार यांच्या नेतृत्वात बीड

पराभव मान्य करून आपण कामाला लागलो. अजितदादा पवार हे कार्यक्षम नेतृत्व आहेते. त्यांच्या नेतृत्वात पक्ष संघटन मजबूत होत आहे. जातपात, धर्मभेदाला त्यांच्याकडे थारा नाही. विकासाचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी अजितदादा कटिबद्ध असतात. पालकमंत्री पद त्यांच्याकडे असल्याने जिल्ह्याचा विकास आता कुणीही थांबवू शकत नाही. जिल्ह्यात चांगले अधिकारी येतील. अजितदादांकडून बीडसाठी विशेष अधिकारी दिला जाणार आहे. राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली बीड विधानसभा मतदारसंघातून जिल्ह्यात सर्वाधिक पक्ष सदस्य नोंदणी करू, असा विश्वास डॉ.योगेश क्षीरसागर यांनी व्यक्त केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अशोक इंगळे यांनी केले. सूत्रसंचलन करून प्रा.पांडुरंग सुतार यांनी आभार मानले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी, महिला-पुरुष कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

-------------

### फडणवीस सरकार

असल्याचे म्हटले जात आहे. दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या या निर्णयामुळे एकनाथ शिंदे यांच्या सरकारमधील तत्कालीन आरोग्य मंत्री तानाजी सावंत हे संशयाच्या फेऱ्यात आहेत. त्यामुळे तानाजी सावंत यांची देखील चौकशी केली जाऊ शकते असा अंदाज आहे. शिंदे सरकारच्या काळात आरोग्य विभागाने घेतलेल्या सर्व निर्णयाची चौकशी केली जाणार आहे. यामध्ये कोणत्या कामासाठी किती निधी घेतला याबाबत चौकशी होणार आहे. शासकीय रुग्णालयांमध्ये आऊट सोर्सिंगच्या माध्यमातून यांत्रिकी पद्धतीने स्वच्छता करण्याचे कंत्राट राज्य शासनाने रद्द केले आहे. या खर्चासाठी शासनाकडे निधी उपलब्ध नसल्याचं कारण देण्यात आले असले तरी ही निविदा प्रक्रिया नियमबाह्य पद्धतीने राबवण्यात आली असल्याचा आरोप विरोधकांकडून होत आहे. तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मंत्रिमंडळातील आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांनी हा गैरव्यवहार केल्याचा आरोप आम आदमी पक्षाचे नेते विजय कुंभार तसेच शिवसेना उद्धव ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी केलाय. या वादग्रस्त निविदेमुळे स्वच्छतेच्या कामावर वर्षाकाठी होणारा ७७ कोटींचा खर्च सुमारे ६०० कोटींवर जाणार होता. महत्त्वाचे म्हणजे मंत्रिमंडळात प्रस्ताव मंजूर नसताना त्याचप्रमाणे अर्थ विभागाची मान्यता नसताना ही निविदा प्रक्रिया रेटण्यात आल्याचे या दोघांनी म्हटले आहे. या निविदेमुळे संबंधित ठेकेदाराला सुमारे ६००० कोटींचा फायदा होणार होता. हा सगळा प्रकार लक्षात आल्यानंतर राज्य शासनाने अर्थातच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या निविदेद्वारे देण्यात आलेले कंत्राट रद्द केले आहे.

-------------

### बीडमुळे अजित पवारांच्या राष्ट्रवादीची

सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याकांडानंतर मंत्री धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी होत आहे. याबाबत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सूचक वक्तव्य करताना म्हटले होते की, माझ्यावर जेव्हा आरोप झाले तेव्हा मी नैतिकतेच्या आधारावर राजीनामा दिला होता. हा दाखला देत धनंजय मुंडे यांनी अजित पवारांना नेमके काय म्हणायचे आहे. हे समजून घ्यावे असेही धस यावेळी म्हणाले. ते म्हणाले की, अजित पवारांच्या भोवती जो कोंडावळा आहे. तो त्यांना योग्य सल्ला देण्याऐवजी अयोग्य सल्ला देत आहेत. त्यामुळे त्यांच्या पक्षाची अपरिमित हानी या प्रकरणामुळे होणार आहे. बीडमध्ये दिवसाढवळ्या माणसे मारल्यानंतर बीडकडे सर्वांचे लक्ष लागणारच. बीडमध्ये सर्वत्रच असमतोलता निर्माण करून ठेवली आहे. आम्ही वारंवार सांगत आहोत की, बिंदू नामावली प्रमाणे कर्मचारी आणा. या ठिकाणी दोन टक्के कर्मचाऱ्यांच्या जागेवर थेट सातशे कर्मचारी झाल्यावर कसे होणार ? असा सवालही धस यांनी यावेळी उपस्थित केला.

-------------

### महिला, मुलांवरील गुन्हे रोखण्यासाठी

रोखण्यासाठी सादरीकरण करण्यात आले. महिला सुरक्षितेसंदर्भात चर्चा झाली. महिलांवरील अत्याचार रोखण्यासाठी उपाययोजना करण्यात येणार आहेत. ड्रग्ज प्रकरणाची कारवाई कशी करता येईल, तसेच ड्रग्ज प्रकरणात पोलिसांचा संबंध असल्याचे निष्पन्न झाल्यास संबंधित पोलिसाला निलंबित न करता बडतर्फ केले जाणार असल्याचे फडणवीस यांनी यावेळी सांगितले. महाराष्ट्राने जो महासागर प्लॅटफॉर्म तयार केला आहे. त्या संदर्भात सादरीकरण झाले. महिला आणि लहान मुलांवरील अत्याचार रोखण्यासाठी आणि गुन्हे झाल्यानंतर लवकरात लवकर आरोप पत्र दाखल करण्याकरता काय करावे, यासंदर्भात चर्चा झाली. महिलांच्या संदर्भात जे गुन्हे दाखल होतात. त्याबद्दल वेळेत आणि लवकरात लवकर चार्जशीट दाखल होणे, या संदर्भात आम्ही एक प्लॅटफॉर्म तयार करत आहोत, असे ते म्हणाले.

-------------

### ८ मार्चपासून मणिपूरचे सगळे

सुनिश्चित करण्याचे आणि अडथळ्यांवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश दिले. तसेच राज्यातील अमली पदार्थांच्या रॅकेटचे उच्चाटन करण्याच्या सूचनाही त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

----------

### बीडमध्ये जीएसटी घोटाळा

राज्यस्तरावर गाजत आहे. संतोष देशमुख खून प्रकरण आणि पिक विमा घोटाळ्यामुळे बीड जिल्ह्याची मोठ्या प्रमाणात बदनामी झाली. आता नव्यानेच जीएसटी घोटाळा उघड होण्याची दाट शक्यता आहे. कमी वेळेत आणि कर चुकवून पैसा कमावणारे अनेक जण बीड जिल्ह्यात आहेत. विशेषत: जीएसटी बुडविणारेही सातत्याने समोर येत आहेत. बीडमधील असाच एक प्रकार उघडकीस आला आहे. शहरातील शेख सलमान रौफ यांना आरोपी नविद इनामदार याने सांगितले की, तुझे आधार कार्ड आणि पॅन कार्ड दे, तुला शासनाच्या मजूर योजनेतून पैसे मिळवून देतो, त्यानंतर शेख सलमान रौफ यांनी आपले आधार कार्ड, आणि पॅन कार्ड आरोपीला दिले. या कागदपत्राचा आधार घेत नविद इनामदार याने एसके सलमान इंटरप्राईजेस नावाने दुकान दाखवून बनावट भाडे पत्रही तयार केले. तसेच त्याच कागदपत्रावर जीएसटीचे बनावट खातेही उघडले, हा सगळा प्रकार शेख सलमान रौफ यांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी थेट पेठ बीड पोलिस ठाणे गाठून स्वत:ची फिर्याद दिली. यावरून पेठ बीड ठाण्यात आरोपी नविद इनामदार विरोधात कलम ३१८ (२) ३३६ (३) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस प्रशासनाने विशेष पथक नेमून जर जीएसटी घोटाळ्याची चौकशी केली तर यामध्ये मोठे व्यापाऱ्यांसह बरेच बडे मासे गळायला लागण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे.

---------------

राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
रविवार, दि. २ मार्च २०२५



# ई-पीक पाहणी मुदतवाढ शेतकऱ्यांसाठी सुवर्णसंधी -नायब तहसीलदार सय्यद

**माजलगाव । प्रतिनिधी**

तालुक्यातील सर्व शेतकरी बांधवासाठी ई पीक पाहणीची वाढीव मुदत दि ०२ मार्च २०२५ रोजी पर्यंत वाढविण्यात आली असुन ही शेतकऱ्यांसाठी एक सुवर्णसंधी असून शेतकऱ्यांनी तहसील कार्यालय मार्फत नेमलेल्या प्रत्येक गावातील ई-पिक पाहणी सहायक यांचा आय डी, पासवर्ड घेऊन ई पीक पाहणी ऑपद्वारे रब्बी हंगामातील पीक पेरा वाढीव मुदत दि ०२ मार्च २०२५ पर्यंत करुन घ्यावेत असे आवाहन नायब तहसीलदार सय्यद यांनी तालुक्यातील शेतकऱ्यांना केले आहे.

शेतकऱ्यांनी ई पीक पेरे सात बारा वर अद्यावत केल्यास शेतकऱ्यांना पिक कर्ज प्रकरण,पीक विमा,खरेदी विक्री , अनुदान,तसेच कृषी संबंधित वेगवेगळ्या योजनाचा फायदा लवकरात लवकर घेता येतो.त्यामुळे सर्व शेतकरी बांधवानी ई पिक पाहणी मुदतवाढीचा फायदा घेऊन या सुवर्ण संधीचा ई पीक पाहणी ऑपद्वारे पीक पेरे भरून घेण्याचे आवाहन माजलगाव तहसील चे नायब तहसीलदार आय पी सय्यद यांनी माजलगाव तालुक्यातील शेतकऱ्यांना केले आहे.

# महाविद्यालयीन विकास समितीच्या अध्यक्षांचा मनमानी कारभार

## खोलेश्वरच्या महिला प्राचार्यांनी दिला राजीनामा

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

मराठवाड्यातील शिक्षण संस्थांमध्ये स्वतःला शिक्षण संस्था नव्हे तर संस्कार केंद्र म्हणून घेणाऱ्या भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या वतीने चालविण्यात येणाऱ्या ऐतिहासिक परंपरा असलेल्या खोलेश्वर महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. प्रीती पोहेकर यांनी स्थानिक विकास समितीच्या अध्यक्षांच्या मनमानी आणि नियमबाये वर्तनाला कंटाळून आपल्या प्राचार्य पदाचा राजीनामा संस्थेचे कार्यवाही यांच्याकडे सुपूर्द केला असून २८ एप्रिल २०२५ रोजी आपल्या प्राचार्य पदावरून कार्यमुक्त करण्यात यावे अशी विनंती त्यांनी केली आहे भारतीय शिक्षण प्रसारक संस्था ही मराठवाड्यातील एक अग्रगण्य शिक्षण संस्था आहे मराठवाड्यातील सातही जिल्ह्यांमध्ये विविध गावांमध्ये या संस्थेचे शाळा महाविद्यालयात शिक्षण क्षेत्रात कार्यरत असताना आपली शिक्षण संस्था ही शिक्षण केंद्र नसून संस्कार केंद्र आहे असा सतत मोठा गाजावाजा या संस्थेमार्फत करण्यात येतो. मात्र या संस्कार केंद्रातील एका नावाजलेल्या महाविद्यालयाच्या स्थानिक विकास समितीचे अध्यक्षांनी महिला प्राचार्यांवर सतत आक्षेप घेणे, परवानगी घेऊन केलेल्या कामावर नंतर लेखी आक्षेप घेणे व मनमानी पद्धतीने महाविद्यालयाचा कारभार पाहण्यासाठी दबावांनी या कामाच्या पद्धतीला कंटाळून महिला प्राचार्या डॉ. प्रीती पोहेकर यांनी आपल्या पदाचा राजीनामा संस्थेच्या कार्यवाहकडे सुपूर्द केला आहे या राजीनामा पत्रात प्रचार डॉ. प्रीती पोहेकर यांनी भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेत आपण कार्यरत झाल्यापासून ते आजपर्यंत महाविद्यालयाच्या स्थानिक विकास समितीचे अध्यक्षांनी आपल्यावर केलेले अन्यायाचे अनेक पाढे विचार असून आपल्या संस्थेत काम करणे अवघड होत चाललेले असल्याचे त्यांनी सांगितले आहे या सर्व अन्यायामुळे आपण खोलेश्वर महाविद्यालयाच्या प्राचार्य पदाचा राजीनामा देत असून आपल्याला संस्थेतून मुक्त करण्यात यावे अशी मागणी केली आहे पत्रात त्यांनी म्हटले आहे की,आपल्या संस्थेमार्फत संचलित सावरकर महाविद्यालयात मी बीड येथे रुजू झाले. तिथे मी अनेक चांगले उपक्रम राबविले महाविद्यालयाची शैक्षणिक स्थिती अत्यंत वाईट होती अगदी समित्यांची रचना देखील विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निर्देशानुसार नव्हती तिथपासून कोणतेही नोंदी नियमित नव्हत्या त्या सर्व शिक्षक सहकाऱ्यांना विश्वासात घेऊन निर्माण केल्या मोठ्या प्रमाणात निधी सावरकर महाविद्यालयास प्राप्त करून दिला. शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांच्या वेळा नियमितपणे केल्या महाविद्यालयातील महिलांसाठी विविध उपक्रम, विद्यार्थी प्रवेश संख्या वाढवली कधीही सुट्ट्या उपभोगल्या नाहीत अशा एक ना अनेक कार्य क्रिया मेहनतीने आणि प्रामाणिकपणे केल्या महाविद्यालयाचा शैक्षणिक आर्थिक सांस्कृतिक सामाजिक विकास करण्याचा साथ सतत विचार व प्रयत्न करीत राहिले हे करत असताना प्रत्येक वेळी माननीय अध्यक्ष महाविद्यालय विकास समिती जिथे गरज असेल आणि नियम असेल त्याप्रमाणे आपल्याशी संपर्क साधलेला होता या सर्व कार्यात महाविद्यालयाचे प्राचार्य या नात्याने माझा मोठा वाटा होता असे असूनही न्याक कार्यालयाच्या भेटीनंतर अनेक योजना मंजूर झाल्या तरीही मला सतत अपमानित करणे विनाकारण रोष व्यक्त करणे सुरू केले मी आपल्याशी संवाद साधण्याचा प्रयत्न करीत राहिले परंतु आपल्याकडून कधीही सकारात्मक प्रतिसाद मिळाला नाही आपल्याला कधीही विचारात घेतले नाही जे निर्णय मी महाविद्यालय विकास समितीच्या परवानगी नंतरच घेतले होते आपण संस्था देणगीची केलेली मागणी देखील पूर्ण केली त्यानंतरही आपण मला अधिक अपमानित करायला सुरुवात केली त्यानंतर आपण माझी बदली केली तेवढ्यावर न थांबता मी आपल्याशी भ्रमणध्वनीवर संवाद साधून तो विषय थेट आपल्याच अख्तरित असल्यामुळे ते पत्र देण्याची विनंती केली होती आणि ते उपलब्ध करून न देता त्यावरच मला आरोपी ठरविणारे पत्र दिले यावरून आपण माझा वेतन वाढीचा प्रस्ताव देऊ इच्छित नाही असे दिसले या सर्व घटना क्रमांचा विचार करता लक्षात येते की मी केलेल्या कोणत्याही चांगल्या कामाची आपण कधीच दखल घेतली नाही खरे तर आम्ही नेतृत्व हा विषय आता मी सांगतो की जे नेत्याला आधी जमले पाहिजे मग मागून आपल्याला जमते मला आपल्या संस्थेत काम करताना आपल्याकडून केवळ अपमान अवहेलना तिरस्कार हेक्टर आणि फसवू नको हे खूप वेळा मिळाले आणि ते सहन केले. भारतीय शिक्षण प्रसारक संस्था अंतर्गत अंबाजोगाई येथील खोलेश्वर महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. प्रीती पोहेकर यांनी आपल्या प्राचार्य पदाचा नुकताच राजीनामा दिला असून त्या सोबतच त्यांनी संस्था कार्यवाहच्या नावे चार पाणी पत्रही पाठवले आहे. २७ फेब्रुवारी रोजी प्राचार्यांनी राजीनामा व हे पत्र संस्थेचे कार्यवाह यांना पाठवले आहे त्यात प्राचार्या पोहेकर यांनी बीडच्या स्वा.सावरकर महाविद्यालयासाठी आपण काय काय केले याचा पाढाच त्यांनी वाचला आहे पत्राच्या शेवटच्या टप्प्यात त्या म्हणतात मला आपल्या संस्थेत काम करताना केवळ अपमान,अवहेलना,तिरस्कार, हेटाळणी, फसवणूक, नकोशी असणे एवढेच अनुभव आले कौतुकाचा एकही शब्द चुकून वापरण्याचा मोठेपणा संस्थेच्या पदाधिकाऱ्यांच्या ठाई दिसून आला नाही एवढेच काय आपण नियुक्त केलेले महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष दैनंदिन कामकाजात प्रचंड हस्तक्षेप करतात महाविद्यालयातील उपक्रमामध्ये वक्ता ठरवणे, कार्यक्रमाची वेळ ठरवणे, विद्यार्थी प्रगतीच्या पत्रावळी स्वतः जाऊन खरेदी करणे, हजेरी पटावरील स्वाक्षरीची वेळ ठरवणे कर्मचाऱ्यांवर नियम बाह्य दंड आकारून ते वसूल करण्याकरिता दबाव आणणे काहीही विचारण्यास कॉल केले असता अनेक वेळा फोन न घेणे फोनवरून परवानगी घेऊन रजा घेतलेली असूनही लेखी रजेला मान्यता न देणे भाषणात गरज नसताना महिला कर्मचाऱ्यांचा नामोल्लेख करून उदाहरणे देणे प्राचार्य कक्षाला पुरुष शोच कुप आहे ते बदलून द्यावे असे म्हटल्यानंतर जवळ घर घ्या ॲडजेस्ट करा वर जात जा असे अप्रतिष्ठत उत्तर देऊन अडवणूक करत असतात प्रशासकीय प्रक्रियेत आदेशाची एकता प्रभावि तत्त्व असते जे कुठेही दिसून येत नाही अशा परिस्थितीत प्राचार्य म्हणून काम करणे कुणालाही कठीण होऊन बसते एका दिव्यांग महिलेस कमजोर समजून हे वर्तन जाणून बुजून केले जात आहे असे दिसते. संस्थेमध्ये होणाऱ्या सततच्या त्रासाने माझी मानसिक स्थिती खालावलेली आहे त्यामुळे काम करणे कठीण होऊन बसले आहे आपण एका खाजगी कार्यक्रमात आपला नामोल्लेख केला नाही म्हणत मला सातत्य दिले जाणार नाही असा निरोप माननीय अध्यक्ष महाविद्यालय समितीच्या करवी पाठवला होता त्यानंतर मी सतत चुकाच करते व काहीच काम करत नाही असे वाटत असेल तर वर्षाखेरीस आपल्या संस्थेतूननिघून जाईल असे आश्वासित मी केले होते त्यानुसार शैक्षणिक वर्ष संपण्यास फार थोडा काळ राहिलेला आहे तेव्हा आपल्या संस्थेतील काहीच दिवस शिल्लक आहेत त्यात आपला चांगला अनुभव घेण्याची संधी द्यावी असे अंबाजोगाईच्या खोलेश्वर महाविद्यालयाच्या प्राचार्या प्रीती पोहेकर यांनी म्हटले आहे याउलट प्राचार्य पदाचा राजीनामा देताना राजीनामा पत्रात अगदी तीन लाईन मध्ये राजीनामा सादर करत दि. २८ एप्रिल २०२५ रोजी आपणास कार्यमुक्त करावे असेही प्राचार्या डॉ.प्रीती पोहेकर यांनी राजीनामा पत्रात म्हटले आहे. या घटनेमुळे संस्थेची प्रतिष्ठा लयाला गेली आहे.



# ज्योतीबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त आज बैठक

**जालना । प्रतिनिधी**

क्रांतीसुर्य महात्मा ज्योतीबा फुले यांची १९८ वी जयंती व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ व्या जयंतीनिमित्त जूना जालना, सावता माळी सभागृह, राजारामनगर जालना शहर महापालिकेच्या पाठीमागे जालना येथे दि. २ मार्च २०२५ रोजी दुपारी १२.३० वाजता बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.

या बैठकीत महात्मा फुले जयंती व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त व्याख्यानमाला, महात्मा फुले यांच्या जीवनावर नाट्यस्पर्धा, महात्मा फुले यांच्या जीवनचरित्र्यावर पवाडे, लाडु वाटप आदि कार्यक्रम करण्याबाबतच्या नियोजनासाठी ही बैठक बोलविण्यात आली आहे. यावेळी महात्मा ज्योतीबा फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार देण्याबाबत व ओबीसीला समाजाला सावित्री आई घरकुल योजना लागु करावी, यासाठी मागणी करण्यात येणार आहे. तसेच माळी समाजासाठी सावित्रीआई फुले महामंडळ स्थापन करायचे याबाबत चर्चा करण्यात येणार आहे. तसेच महात्मा ज्योतीबा फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त सार्वजनिक सुट्टी व मद्यपान बंद ठेवावे आदिबाबत चर्चा करण्यात येणार आहे.

या बैठकीस अखिल भारतीय महात्मा समता परिषद सर्व पदाधिकारी, सदस्य, माळी महासंघ, सर्व पदाधिकारी, सदस्य, सावता परिषद सदस्य पदाधिकारी, आंबेडकर अनुयायी, ओबीसी समाजातील पदाधिकारी, भटक्या, विजेएनटी,एनटी पदाधिकाऱ्यांनी व सदस्यांनी उपस्थित रहावे असे आवाहन भास्करराव अंबेकर, अश्विन अंबेकर, बाबासाहेब शिवाजी वानखेडे, डॉ. विशाल धानुरे, प्रा.राजेंद्र जाधव, अमोल धानुरे, गोकुळ स्वामी, दीपक वैद्य, सुधाकर निकाळजे, शेख इब्राहिम, सुनिल रत्नपारखे, शिवलाल अक्षय, बाबा पठाण,सुरेश रत्नपारखे, संतोष जमधडे,अमरदीप शिंदे, नितीन तायडे,मधुकर झरेकर, सुंदरराव कुदळे, बाबासाहेब सोनवणे, योगेश रत्नपारखे, निखील पगारे, गजानन खांडेभराड, राजेंद्र शिंदे, स्वप्नील गायकवाड, संदीप हिवराळे, इब्राहिम शेख, गणेश तरासे, बाबुराव मामा सतकर, मा. जि.प. सदस्य बबनराव खरात, संतोष परळकर, मगरे टेलर, गवई, राजेश मगरे, आबा पाटील, वरखेडचे सरपंच सर्जेराव शेवाळे,आसाराम रायकर, सागर राऊत, कुंभेफळचे सरपंच सुधाकर खरात, प्रभाकर घडलिंग, संतोष पाटील खरात, राहुल रायकर, नंदकुमार जाधव, देवनाथराव जाधव, डॉ. सुशिल धानुरे, डॉ. श्रावण शेवाळे, रामदास शेवाळे शिक्षणाधिकारी बाबासाहेब खरात, विशाल वाघमारे, सदाशिव वाघमारे, बाबासाहेब गाडेकर, प्रभाकर खरात, संजय खरात ,मदन खरात, बंडु पाऊलबुध्दे, शिवनाथ पाऊलबुध्दे,विलास राऊत, संतोष राऊत, रमेश मुळे, रामेश्वर गाडेकर,अर्शद बागवान, बाळु देशमुख,किशोर मघाडे, सचिन पगारे, बाबासाहेब गाडेकर, दत्ता खांडेभराड, वैजीनाथ नागरे, ॲड. रामेश्वर खांडेभराड,परमेश्वर खांडेभराड, अनिल वाघमारे, ॲड. राजाळे, ॲड. दैणे, लक्ष्मण इधाटे, शिवाजी घायाळ, बंडु जाधव, शंकर घोडके, शंकर सातपुते, ऋषीधंर राऊत, निलेश वानखेडे, सचिन जैवळ, सचिन वानखेडे, दिलीप पाऊलबुध्दे, सतीश खांडेभराड, पंडीत जाधव, जनार्धन जाधव, आशिष वैद्य, लक्ष्मण गडकरी, रमेश गडकरी, गोविंदराव बारवकर, अशोक खांडेभराड, नितीन इंगळे, धरम इंगळे, रामभाऊ जाधव, सय्यद अखिल, महेंद्र शिंदे, दशरथ तोंडुळे, आसाराम राठोड, सलमान शेख, महासंघाचे अध्यक्ष मुस्ताक बेग (जॉनी), बाबासाहेब खांडेभराड, फुलझाडे, रघुनाथ मगर, सुरेश दांडगे, दगडु बडदे, राहुल मुळे, प्रा बुलबुले, शिवलाल घाडगे, सतिश फत्तेपुरीये, सिध्दार्थ पवार, गणेश जाधव आदिंनी केले आहे.



# बुखारी उर्दू शाळेत राष्ट्रीय विज्ञान दिवस साजरा

माजलगाव ( प्रतिनिधी )

बुखारी प्राथमिक उर्दू शाळेत आज राष्ट्रीय विज्ञान दिवसाच्या भव्य विज्ञान प्रदर्शन कार्यक्रम राबविण्यात आला या विज्ञान प्रदर्शनाला प्रमुख उपस्थिती म्हणून गटशिक्षणाधिकारी श्री रवींद्र महामुनी साहेब,तालुका विज्ञान प्रमुख श्री लक्ष्मण पोटभरे सर,उपस्थित होते प्रकल्प निरीक्षक, म्हणून गोदावरी महाविद्यालयाचे प्राचार्य श्रीमती खान सबा मॅडम,श्रीमती हुमेरा मॅडम यांनी प्रकल्पाचे बारकाईने निरीक्षण केले व प्रदर्शनामध्ये पाचवी ते सातवीच्या ७० विद्यार्थीनी ने सहभाग घेऊन अदभूत कल्पना चा प्रदर्शन केला बुखारी शाळेचे विज्ञान विषयी निरीक्षण सय्यद आरिश सर,माजेद खान सर व खान फरीन मॅम,यांनी विद्यार्थीने उत्कृष्टपणे प्रकल्प तयार करण्यात मार्गदर्शन केले

या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून संस्थेचे अध्यक्ष, अजहर नाईक साहब,सह सचिव, इम्रान भैय्या नाईक साहब,प्रमुख उपस्थिती होते या विज्ञान प्रदर्शनाला तालुक्यातील सर्व उर्दू मराठी खाजगी व जी.प.प्रा शाळाचे मुख्याध्यापक,व शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी भेट दिली

या प्रसंगी .गट शिक्षणाधिकारी रवींद्र महामुनी साहेबांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व अजहर नाईक साहब ,इमरान भैया नाईक साहब,व उपस्थितीच्या हस्ते प्रथम व द्वितीय व तृतीय पारितोषिक देण्यात आले तसेच विद्यार्थ्यांना चांगले मार्गदर्शन केल्याबद्दल विज्ञान विषय शिक्षकाचे सत्कार करण्यात आले

बुखारी प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक शेख नवीद सर,प्राचार्य शेख हारून सर आणि व समन्वय अधिकारी शेख इरफान सर यांच्या उत्कृष्ट नियोजन व मार्गदर्शनात हा कार्यक्रम यशस्वी झाला तसेच कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती फरहीन मिस यांनी केले आभार प्रदर्शन सय्यद इब्राहिम सर यांनी केले.कार्यक्रमाला यशस्वी करण्यासाठी शाळेचे सर्व शिक्षक व शिक्षिका व सेवक यांनी खूप परिश्रम केला.

# विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविण्यासाठी विज्ञान प्रदर्शन गरजेचे-दराडे

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई शहरातील प्रशांत नगर भागातील संकल्प विद्या मंदिर येथे आज २८ फेब्रुवारी ''राष्ट्रीय विज्ञान दिन'' उत्सवामध्ये साजरा करण्यात आला यावेळी विद्यार्थ्यांनी विविध प्रयोगाचे सादरीकरण केले होते या कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून खोलेश्वर शाळेचे माजी मुख्याध्यापक निवृत्ती दराडे सर, के डी एस क्लासचे संचालक शिव सागर सर, शाळेचे कार्यवाह कैलास चोले सर ,शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती आर एस बडे मॅडम यांची प्रमुख उपस्थिती होती तर परीक्षक म्हणून उत्कृष्ट भूमिका निभावणारेप्रा. देवकर सर, प्रा.अविनाश साखरे, प्रा. इंगळे सर प्रा.शिरसाट सर मंचावर उपस्थित होते.



यावेळी विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या विविध प्रयोगाची ची पाहणी मान्यवरांनी केली नाविन्यपूर्ण प्रयोग सादर करणाऱ्या विद्यार्थ्यांसी संवाद साधत त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप मान्यवरांनी दिली.

सी.व्ही. रमण यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विज्ञान प्रदर्शनास सुरुवात करण्यात आली. इयत्ता पहिली ते नववी तील वर्गानुसार प्रथम, द्वितीय क्रमांक काढून मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह देण्यात आले यावेळी प्रा.शिव सागर सर यांनी विज्ञान प्रदर्शनामध्ये सहभाग घेतलेल्या विद्यार्थ्यांचे तोंडभरून कौतुक करून शुभेच्छा दिल्या.

श्री दराडे सर यांनी प्रखर इच्छाशक्ती असेल तर आपण कोणत्याही अडचणीवर मात करू शकतो याची काही मोजकी उदाहरणे विद्यार्थ्यांना देऊन विद्यार्थ्यांमध्ये उत्साह वाढवला. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवण्यासाठी संकल्प विद्यामंदिर शाळेने आयोजित केलेले विज्ञान प्रदर्शनाचे तोंड भरून कौतुक करून आजच्या काळाला हे गरजेचे आहे असे मत व्यक्त केले. प्रा.देवकर सर यांनी यावेळी शालेय प्रशासनासह विद्यार्थ्यांचे कौतुक करून विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन यावेळी डॉ.सी.व्ही. रमण यांनी केलेल्या रमन इफेक्ट बद्दलची माहिती तसेच त्यांनी केलेल्या विविध संशोधनाबाबत माहिती दिली.तसेच विज्ञानाची सुरुवात आपल्या स्वयंपाक घरापासून होते याची विविध उदाहरणे,दाखले देऊन विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविण्यासाठी शाळेबरोबरच घराचे सुद्धा योगदान महत्त्वाचे आहे असे सांगितले. वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविण्यासाठी विज्ञान प्रदर्शन अत्यंत गरजेचे आहे असे प्रतिपादन याप्रसंगी केले. तर या कार्यक्रमाचे उत्कृष्ट असे प्रास्ताविक विज्ञान विषयाच्या शिक्षिका श्रीमती अनिता कुलकर्णी मॅडम यांनी केले तर सूत्रसंचालन कु. अमृता कदम व कु.आकांक्षा कदम या विद्यार्थिनी केले तर आभार कु श्रेया महाजन हिने मानले.यावेळी या कार्यक्रमाचे सर्व नियोजन करण्यासाठी विज्ञान विभाग, सांस्कृतिक विभाग, व सर्व शिक्षक वृंद यांनी परिश्रम घेतले.

पान ६ वरून...

## लेखणीतून समाजाच्या

एकताचे राज्य स्तरीय पदाधिकारी कवी मल्हारी खेडकर, शिवलिंग परळकर, मराठी भाषा विषय शिक्षक महासंघाचे बीड जिल्हा अध्यक्ष डॉ.आत्माराम झिंजुर्डे आदीसह मान्यवर उपस्थित होते. प्रारंभी कुसुमाग्रजांच्या प्रतिमेचे मान्यवरांच्या हस्ते पूजन व प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. प्रगती शिक्षण संस्थेतील मुख्याध्यापक श्रीयुत सांगळे यांनी कवी संमेलनाचे अध्यक्ष प्रा.बिभिषण चाटे यांचे स्वागत केले. या कवी संमेलनात जेष्ठ कवी अनंत कराड यांनी सामाजिक स्थित्यंतरावर नेमके बोट ठेवत आपल्या कवितातून परिवर्तनाची हाक दिली, प्रा. डॉ .विठ्ठल जाधव यांनी संविधानाचे महत्त्व अधोरेखित करत विद्रोही कविता सादर केली, प्रा. विनोद गलांडे यांच्या कवितेलाही प्रतिसाद मिळाला, डॉ. अशोक घोळवे यांनी केलेली कविता प्रतिसादास पात्र ठरली, कवी बाळासाहेब गवळी यांनी सामाजिक विषयावर भाष्य केले; तर दादाराव वाल्हेकर यांच्या विद्रोही कवीतेने अक्षरशः सभागृह स्तब्ध झाले. मल्हारी खेडकर आदी सह अनेक मान्यवर कवींनी गेय कविता सादर केल्या.यावेळी शिरूर कासार गट साधन केंद्राच्या श्रीमती संध्या कुलकर्णी, सुलभक सुभाष सांगळे, श्रीमती रंजना फुंदे, श्रीमती लता बडे, एकता चे नितीन कैतके, महादेव राऊत आदी सह मान्यवरांनी सहभाग नोंदवला.प्रस्तावना राजेश बिडकर यांनी, सुत्रसंचलन दादाराव वाल्हेकर तर कवी ह.भ.प. गहीनीनाथ महाराज खेडकर यांनी आभार मानले.

..तर मराठी भाषेस सोनेरी दिवस येतील!

संत ज्ञानेश्वर,कविवर्य कुसुमाग्रजांसह मुकुंदराज स्वामी महाराजांसारख्या असंख्य दिग्गजांनी मराठी भाषेला समृद्ध केले. मराठी ही आत्म्याची भाषा असून ती ज्ञानाची व्हावी या हेतूने मायबाप सरकारचे प्रयत्न दिसत आहेत.. भविष्यात मराठी भाषेच्या संवर्धनासाठी बहुविध प्रयत्न होऊन निर्णय प्रक्रिया घडावी, तेव्हा नक्कीच मराठी भाषेस सोनेरी दिवस येतील. देश आणि जगाच्या क्षितिजावर मराठी शब्दांना वलय प्राप्त होईल! अशी अपेक्षा या मंचावर एकता चे संस्थापक अध्यक्ष साहित्यिक अनंत कराड आणि शिवलिंग परळकर यांनी व्यक्त केली.

पान ६ वरून...

## कुस्तीच्या जंगी हंगाम्यात

यांचा मराठी हिंदी गाण्यांचा आर्केस्ट्राचा कार्यक्रम होणार आहे.शुक्रवारी ४ ते ६.३० यावेळात जंगी कुस्त्यांचा हंगामा झाला.यावेळी माजी आ.भीमराव धोंडे यांनी सर्व पैलवानास बक्षीस दिले.यावेळी महाराष्ट्र केसरी सईद चाऊस, पोलीस अधिक्षक बजरंग बन्सोडे,पो.नि.राजु बन्सोडे, सरपंच तात्या नालकोल, उपसभापती नामदेव धोंडे,राजेंद्र धोंडे, अभयराजे धोंडे,पत्रकार उत्तम बोडखे,माजी सरपंच संजय नालकोल, प्रा.डा. बाळासाहेब धोंडे,सेवानिवृत पीएसआय शेख अन्सारभाई, इंजि.पी.बी.बोडखे,चेअरमन बबन नन्नवरे,गोरख तावरे,प्रा. आर.जी.विधाते,आनंदराव बन्सोडे,चेअरमन दादासाहेब हजारे, रामदास धोंडे, पोलीस बबन पवार,चेअरमन दादासाहेब हजारे,शिवाजी नालकोल, आजिनाथ नलकोल, दादासाहेब काळे, भाऊसाहेब बन्सोडे आदि मान्यवर उपस्थित होते.या जंगी हंगाम्यात महाराष्ट्र केसरी सईद चाऊस आणि निखील धोंडे यांची २५ हजार रु ची दवंडीची कुस्ती झाली.मयुर तांबे आणि साहील शेख,ओम आंधळे,तुषार खांडवे यांच्या कुस्ती झाली.अमोल दिंडे आणि मयुर कणसे,शिवनाथ वनवे अशोक मोटे,अमृत कर्डीले,राम क्षीरसागर यांच्या कुस्त्या झाल्या.यावेळी माजी आ. भीमराव धोंडे यांनी वैयक्तिक कुस्त्या करणाऱ्या पैलवानांना बक्षीस दिले.यावेळी माजी आ.भीमराव धोंडे, सरपंच तात्या नालकोल,उपसरपंच विष्णु मांढरे,माजी सरपंच नामदेव धोंडे, पांडुरंग धोंडे,अनिल गाजघाट,संजय नालकोल,पोपटनाना बन्सोडे, बबनराव औटे,पैलवान जालींदर पोकळे,पैलवान आजिनाथ विधाते हबीब शेख,हनुमान झगडे,बंडु माने,कल्याण कसाब, आण्णा क्षीरसागर,बंडु नालकोल,आजिनाथ बन्सोडे, बाप्पासाहेब खिलारे,आदिनाथ कन्हेरकर,प्रा.जी.पी.बोडखे, चंद्रकात तुपे,सुभाष धोंडे,प उपप्राचर्य संजय धोंडे, प्रा. श्रीकांत धोंडे,दादासाहेब नालकोल,बाळसाहेब नालकोल, अशोक फरांडे,योगेश फरांडे, बबन फरांडे, दशरथ कन्हेरकर, शरद आप्पा नालकोल,हनुमंत सासवडे,छगन खोडके,शिवाजी नालकोल,राजेंद्र गांजुरे फौजी, मारुती शिवरकर, अनिल नालकोल, ग्रामपंचायतीचे सर्व सदस्य आदि उपस्थित होते.या हंगाम्यात आष्टी,बीड,आकलुज, मंगरुळ,केरुळ, माहिजळगांव,बेलगांव, कडा,कर्जत आदि गावचे पैलवान कुस्तीसाठी आले होते.

## कला पथकाच्या चित्तथरारक

चालवणे, तलवार चालवणे, युद्ध खेळणे, अशा विविध चित्तथरारक कला सादर करून वडवणीकरांच्या डोळ्यांचे पारणे फेडले. तर धार्मिक कार्यक्रमांमध्ये पारंपारिक वारकरी वेशभूषामध्ये बाल वारकरी भजनी मंडळातील विविध खेळ, टाळ खेळत छत्रपती शिवरायांच्या नामाचा जय घोष केला. महाराष्ट्रातील अकलुज येथील प्रसिध्द हलगी पथक, अलंकार बॅन्जो, उंट, घोड्यावर महापुरुषांची वेशभूषा करत बालकलाकारांनी देखावा सादर करत लक्ष वेधून घेतले होते. भव्य दिव्य मिरवणुकीमध्ये महिला व युवक पुरुषांना फेटेधारी महिला मंडळ व फेटेधारी युवक मंडळ, संपूर्ण शहरामध्ये निरनिराळ्या कलरमध्ये फटाक्यांची आतिषबाजी, वडवणी शहरात विद्युत रोषणाई, लेझर शो लाईट यांसह आदी भरगच्च कार्यक्रमांनी भूतो ना भविष्याची अशी डिजेमुक्त जयंती साजरी करण्यात आली आहे. या शोभायात्रेत महिलांसह शिवभक्त हजारोंच्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी वडवणी पोलिसांनी ठिकठिकाणी चोख बंदोबस्त ठेवत शांततेत शिवजन्मोत्सव शोभायात्रा पार पाडली. यावेळी, महिला, शिवभक्त, पोलीस, पत्रकार, यांचे सार्वजनिक शिवजन्मोत्सव समितीच्या वतीने आभार मानण्यात आले आहे.

## सामाजिक समतोल राखण्यासाठी

सदरील कार्यक्रमात कॉंग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष यांनी जिल्ह्यातील गेल्या तीन चार महिन्यातील गुन्हेगारीची पार्शश्वभूमी वर मुद्देसूद भाष्य करत, जिल्ह्यातील असणारी ओळख ही सामाजिक समता, सहिष्णूता व पुरोगामी विचार तसेच समतावादी विचाराचा वारसा व सामाजिक समतोल अबाधित राखण्यासाठी जिल्ह्यातील राजकारण विरहित समतावादी, पुरोगामी विचार जपणारे व संविधानाचा पुरस्कार करणाऱ्या प्रत्येकाने सदभावना पदयात्रेत सहभागी व्हावे असे आवाहन उपस्थितांना कॉंग्रेस भवन येथे केले. यावेळी जेष्ठ नेते, प्रवीणकुमार शेफ, प्रताप मोरे, ॲड. इनामदार, महावीर मस्के, शेख अहेमद,नाथाभाऊ घडसे, यांची प्रमुख उपस्तीथी होती. तसेच,हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शहराध्यक्ष अफरोज तांबोळी,बळीराम कारके, नेहाल इनामदार, अक्षय थोरात, विनोद सुर्वे, विष्णू चाटे, श्रीनिवास शेळके, प्रकाश क्षीरसागर सह कॉंग्रेस कार्यकर्ते यांनी प्रयत्न केले.यावेळी कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन शिवसागर शेलूकर यांनी केले.

## किशोर वयीन आरोग्य

यासाठी देखील काळजी घ्यावी

यावेळी सरपंच सौ कासाबाई जाधव, कुसुमबाई भागवत, शकील मोमीन,रतन सिंग चरावडे, नारायण शिंदे,ज्ञानेश्वर शेळके, विनोद गवळी, श्री शिरसागर आणि कोलकर आरोग्य सेवक,आरोग्य सेविका अलका मुराडे,शेख सर, दिलीप पैठने, पांडुरंग बोडखे,सुखदेव लबडे यांचे सह वर्ग सात, आठ,नऊ या इयत्तेचे मुले - मुली उपस्थित होते.संचलन श्री नारायण शिंदे यांनी केले तर आभार ज्ञानेश्वर शेळके यांनी केले

# मक्याचा बाजार स्थिर; हरभरा, कारली, कापूस तसेच काय आहे सोयाबीन भाव?

सरकारने पिवळा वाटाण्याच्या मुक्त आयातीला मुदतवाढ न दिल्याचा आधार हरभरा बाजाराला मिळाला आहे. आजपासून पिवळा वाटाणा आयातीवर ५० टक्के शुल्क आणि २०० रुपये किमान आयात मूल्य लागू झाले. त्यामुळे आज हरभरा बाजारात सरासरी क्विंटलमागे ५० रुपयांची सुधारणा दिसून आली. आज बाजारात ५ हजार २०० ते ५ हजार ६०० रुपयांच्या दरम्यान हरभरा विकला गेला. बाजारात पुढील दोन महीने आवकेचा दबाव राहणार आहे. त्यामुळे हरभरा बाजारावरील दबावही कायम राहील, असा अंदाज हरभरा बाजारातील अभ्यासकांनी व्यक्त केला.

राज्यातील बाजारात कारल्याची आवक सुधारली आहे. कारल्याला चांगला उठाव मिळत आहे. मात्र बाजारातील आवक वाढल्याचा परिणाम दरावर दिसून आला. कारल्याचे भाव मागील आठवडाभरापासून काहीसे कमी झाले. आठवडाभरात कारल्याचे भाव क्विंटलमागे ३०० ते ५०० रुपयांच्या दरम्यान कमी झाले. सध्या बाजारात कारली प्रतिक्विंटल २ हजार ५०० ते ३ हजार रुपयांच्या दरम्यान विकले जात आहेत. कारल्याची आवक आणखी काही दिवस कायम राहील, असा अंदाज शेतकरी आणि व्यापारी व्यक्त करत आहेत.

देशात मक्याला यंदा चांगली मागणी आहे. इथेनॉल, पोल्ट्री आणि स्टार्च उद्योगांकडून चांगला उठाव आहे. मात्र दुसरीकडे बाजारातील आवकही स्थिर आहे. देशात मक्याचा स्टॉकही चांगला आहे. रब्बीतील मक्याची लगावडही वाढली आहे. या कारणांनी बाजार मागील दोन महिन्यांपासून एका दरपातळीच्या दरम्यान दिसत आहे. आजही मक्याला सरासरी २ हजार १०० ते २ हजार ३०० रुपयांच्या दरम्यान भाव मिळाला. मक्याच्या भावात पुढील दोन -तीन आठवडे काहीसे चढ उतार राहू शकतात, असा अंदाज मका बाजारातील अभ्यासकांनी व्यक्त केला.



आंतरराष्ट्रीय बाजारात सोयाबीनचे भाव दबावातच आहेत. बाजारभाव एका पातळीपेक्षा वाढताना दिसत नाहीत. देशातही भावपातळी दबावात असून हमीभावापेक्षा आजही किमान एक हजार रुपये कमी भाव मिळत आहे. बाजार समित्यांमध्ये सोयाबीनला ३ हजार ७०० ते ४ हजार रुपयांच्या दरम्यान भाव मिळाला. तर प्रक्रिया प्लांट्सचे सोयाबीन खरेदीचे भाव ४ हजार २५० ते ४ हजार ३०० रुपयांच्या दरम्यान स्थिर होते. तर बाजारातील सोयाबीनची आवकही स्थिर आहे. त्यामुळे सोयाबीनच्या भावातील चढ उतार कायम राहतील, असा अंदाज सोयाबीन बाजारातील अभ्यासकांनी व्यक्त केला.

कापसाचा भाव जागतिक पातळीवर कमी आहेत. अमेरिकेतील कापूस बाजारावर वाढलेल्या डॉलरच्या भावाचा परिणाम होत असून निर्यात कमी होत आहे. त्यामुळे चालू आठवड्यात कापूस भावात पुन्हा २ टक्क्यांची घट दिसून आली. तर देशातील बाजारात कापसाची आवक स्थिर असून बाजारभावही कायम आहेत. आजही देशातील बहुतांशी बाजारात कापसाला सरासरी ७ हजार ते ७ हजार ३०० रुपयांच्या दरम्यान भाव मिळाला. देशात बाजारातील आवक कमी होत असल्याने दराला काहीसा आधार मिळत आहे. कापसाची आवक मार्च महिन्यातही कमी होईल, असा अंदाज कापूस बाजारातील अभ्यासकांनी व्यक्त केला.

## शेतकऱ्यांनो मातीचे आरोग्य सांभाळा

आपले आजोबा वडील हे पारंपरिक पद्धतीने शेती करत आलेत. तेही रासायनिक खतांचा वापर करतच होते. परंतु त्या वेळच्या जमिनी ह्या सुपीक जमिनी होत्या शेणखताचा योग्य वापर व्हायचा व त्याचबरोबर जमिनीची पोत टिकवून होती. आताचा विचार केला तर परिस्थितीत बदल झालेला आहे. कारण आपली जमीन नापीक होऊ लागले शेतकरी बांधवांनी वेळीच लक्ष दिलं तर त्याचा भला मोठा फायदा होऊ शकतो आज माती परीक्षणाचे अमूल्य फायदे शेतकऱ्यांना लक्षात येत आहेत ते आपल्या शेतीचे माती परीक्षण करुन घेत आहेत.



माती परीक्षणाचे फायदे : १) माती परीक्षणामुळे जमिनीत असलेल्या अन्नद्रव्यांचे प्रमाण समजते

२) जमीन आम्लधर्मी आहे की विम्लधर्मीय आहे त्यानुसार पिकांचे नियोजन करता येते. ३) संतुलित खतांचा वापर करता येतो पीक उत्पादन वाढीबरोबर खतांची बचत होते पिकांच्या वाढीस आवश्यक असणारे अन्नद्रव्यांचा समतोल कायम समतोल राखता येतो. ४) माती परीक्षणामुळे जमिनीची सुपीकता टिकून उत्पादन वाढविण्यास मदत होते. ५) शास्त्रशुद्ध पद्धतीने मृदा नमुने काढण्यावर माती परीक्षण प्रयोगशाळेची गुणवत्ता व खतांची शिफारस मात्रा अवलंबून असते त्याकरिता योग्य माती नमुने प्रयोगशाळेत जमा करावेत.

माती परीक्षणाचे महत्व : मातीचा प्रातिनिधिक नमुना तयार करणे ही माती परिक्षणाची सर्वात महत्त्वाची कृती होय या नमुन्याचे रासायनिक पृथक्करण बऱ्याच अंशी अचूक सुपिक्ता दाखविते. माती परीक्षण म्हणजे शेत जमिनीतील नमुन्याचे प्रमुख्याने रासायनिक पृथक्करण करून त्यातील उपलब्ध मुख्य नत्र स्फुरद पालाश कॅल्शिअम मॅग्नेशिअम सल्फर व सूक्ष्म अन्नद्रव्यांचे लोह जस्त मंगल तांबे बोरॉन मॉलिब्डेनम इत्यादी प्रमाण तपासणी होय. आवश्यक असल्यास जमिनीची भौतिक व जैविक गुणधर्मांची तपासणी सुद्धा केली जाते.

मातीचा नमुना केव्हा घ्यावा : १) मातीचा नमुना वर्षातून केव्हाही आवश्यक असेल तेव्हा घेता येतो परंतु रब्बी पिकांच्या काढणीनंतर किंवा उन्हाळ्यात घेतल्यास पुत्तकरण करून परीक्षण अहवाल पेरणी पर्यंत उपलब्ध होतो. २) पिकांच्या काढणीनंतर च्या काहीवेळेस जमिनी कोरडे असताना. ३) जमिनीवर पीक उभे असताना मातीचा नमुना घ्यावयाचा असेल तर खाते दिल्यानंतर दोन महिन्यांनी मातीचा नमुना पिकांच्या दोन ओळींमधून घ्यावा. ४) कोणत्याही परिस्थितीत पिकांना दिलेल्या खतांच्या मात्रेनंतर लगेच च मातीचा नमुना घेऊ नये.

जमिन झपाट्याने नापिक होतेय : आपण वेळीच जागे झालो नाही तर, शेती , पर्यावरण आणि समाज यांच्यावर होणाऱ्या दुष्परिणामांनं आपल्याला सामोर जावे लागेल. शास्त्रज्ञ म्हणताय ,भविष्यात मुलांना नुसता सातबारा उतारा नका देवू, त्यासोबत उत्कृष्ट पध्दतीचे जमिनपण द्या. योग्य दिशेने प्रयत्न केले तर आपण आपली जमिन वाचवू शकतो. योग्य खत व्यवस्थापन आणि फायदेशीर शेती उत्पादन यासाठी मातीपरिक्षण हे एक शेतीच अवश्य अंग आहे. माती परिक्षणामुळे आपल्या जमिनीचा सामु किती आहे, त्यात कुठले अन्नघटक किती प्रमाणात कमी जास्त आहेत हि माहिती मिळते. ह्यामुळे शेतकरी बांधवांच्या खर्चात बचत होवून. संतुलीत खतांचा वापरून भरघोस उत्पादन काढता येते. माती परिक्षणाचे अमुल्य फायदे शेतकरी बांधवांना कळत आहेत.

## उन्हाळी हंगामातील भाजीपाला पिकांचे नियोजन

महाराष्ट्र मध्ये उन्हाळी हंगामात प्रामुख्याने कलिंगड,खरबूज, काकडी, दोडका, घोसाळी, कारली, भेंडी, गवार, वांगी, मिरची, चवळी इत्यादी भाजीपाला पिकांचे उत्पादन घेतले जाते. उन्हाळ्यामध्ये या भाजीपाल्याची योग्य व्यवस्थापन करणे फार गरजेचे असते.उन्हाळी हंगामात भाजीपाला लागवडीसाठी प्रमुख्याने अधिक सेंद्रिय कर्ब व पाणी साठवून ठेवणारी परंतु पाण्याचा उत्तम निचरा होणाऱ्या सुपीक जमिनीची निवड करावी.

जमिनीवर आच्छादनाचा वापर : कोरडे व उष्ण वाऱ्यांपासून संरक्षणासाठी शेताच्या चारही बाजूने शेवरी सारखे पिकाची अथवा वाफ्याभोवती मक्याचे दाट लागवड करावी. त्यासोबतच रोगप्रतिकारक जातींची निवड, सिंचनाच्या सुयोग्य व्यवस्थापन व रासायनिक व सेंद्रिय खतांची योग्य संतुलन याकडे व्यवस्थित लक्ष द्यावे. फळांची काढणी शक्यतो संध्याकाळी करावी. स्वच्छ ठिकाणी प्रतवारी व पॅकिंग,साठवण व योग्यवेळी मालवाहतूक या बाबींचा नियोजनपूर्वक एकत्रित वापर करावा.

भेंडी आणि गवार – उन्हाळ्यामध्ये घेतल्या जाणाऱ्या भेंडी व गवार या भाज्यांना मागणी भरपूर असते. भेंडी लागवड करताना हळद्या या रोगास प्रतिकारक्षम आशा परभणी क्रांती, अर्क अनामिका, पुसा सवानी, पंजाब पद्मनी या वाणांची निवड करावी.गवार लागवड करायची असेल तर पुसा सदाबहार, पुसा नवबहार यासारख्या भरपूर उत्पादन देणाऱ्या जातींची निवड करावी.उन्हाळ्यात या पिकांना पाणी वेळेवर द्यावे व पिकांची तोडून संध्याकाळच्या वेळेस करावी.

वेलवर्गीय भाजीपाला पिके – यामध्ये प्रामुख्याने काकडी, कारले, दुधी भोपळा, दोडका इत्यादी प्रमुख भाजीपाला पिकांचा समावेश होतो. या सर्व भाज्यांची लागवड बियांद्वारे व रुंद अंतर ठेवून केली जाते. लागवडीनंतर बियांची उगवण झाल्यानंतर काही दिवसांनी वेलीला वळण देणे व आधार देणे ही कामे महत्त्वाचे आहेत. दर्जेदार, जास्तीच्या उत्पादनासाठी वेलीला मंडप किंवा तारेच्या ताटीच्या आधार द्यावा. कारली, दुधी भोपळा, दोडका इत्यादी कमकुवत वेल वर्गात मोडणारी पिके असून वेलींना चांगला आधार मिळाला त्यांची वाढ चांगली होते.

मिरची, वांगी आणि टोमॅटो– या तिने पिकांची रोपे गादीवाफ्यावर तयार करावीत. डिसेंबर किंवा जानेवारी महिन्यात गादी वाफ्यावर बियाणे पेरून झाल्यानंतर साधारणपणे जानेवारी ते फेब्रुवारी महिन्यात रोपांची लागवड केली जाते. या पिकांमध्ये विषाणूजन्य रोगाचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी त्यांचा प्रसार करणाऱ्या किडींच्या नियंत्रणासाठी दक्ष राहावे. मिरची लागवड करताना तिचे उत्पादन मार्च ते मे महिन्यात बाजारात येईल असे करावे. कोथिंबीर– कोथिंबीर पिकास कोरडे हवामान चांगले मानवते. उन्हाळी हंगामात कमी पाण्यावर येणारे कोथिंबिरीचे पीक कमी कालावधीत चांगले पैसे देऊन जाते. कोथिंबीर पिकाची लागवड करताना वाफे तयार करावेत. दर आठ दिवसांच्या अंतराने कोथिंबीरीची लागवड करावी.






### जागतिक दिवस:
स्वांतत्र्य दिन मोरोक्को
स्वांतत्र्य दिन टेक्सास
राष्ट्रीय क्रीडा कौशल्य दिन

### महत्वाच्या घटना

१८३६: आजच्या दिवशी टेक्सास ने मेक्सिको पासुन स्वतःचे स्वातंत्र्य घोषित केले.
१८५५: अलेक्झांडर (दुसरा) हा रशियाचा झार बनला.
१८५७: जे. जे. स्कूल ऑफ आर्टस सुरू झाले
१९०३: 'मार्था वॉशिंग्टन हॉटेल' हे फक्त महिलांसाठी असलेले जगातील पहिले हॉटेल न्यूयॉर्क मधे सुरू झाले.
१९३०: आजच्या दिवशी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली काळा राम मंदिरामध्ये सर्वांना प्रवेश मिळावा म्हणून सत्याग्रह करण्यात आला.
१९४६: हो ची मिन्ह यांची उत्तर व्हिएतनामचे अध्यक्ष म्हणून नेमणूक झाली.
१९४९: न्यू मिलफोर्ड, कनेक्टिकट येथे रस्त्यावरील स्वयंचलित दिवे बसविण्यात आले.
१९५२: पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या हस्ते सिंद्री येथील खत कारखान्याचे उद्घाटन
१९५६: मोरोक्को देशाला फ्रान्सकडून स्वातंत्र्य मिळाले.
१९६९: फ्रेन्च बनावटीच्या 'कॉन्कॉर्ड' या पहिल्या स्वनातीत (ध्वनीपेक्षा अधिक वेगाने जाणार्या) विमानाचे यशस्वी उड्डाण
१९७०: ब्रिटनकडून स्वातंत्र्य घेऊन र्होडेशिया प्रजासत्ताक बनले.
१९७२: अमेरिकेचे 'पायोनिअर-१०' यानाचे गुरुच्या दिशेने उड्डाण झाले
१९७८: स्वित्झर्लंडमधील दफनभूमीतुन चार्ली चॅप्लिनची शवपेटिका चोरीला गेली.
१९९२: आर्मेनिया, अझरबैजान, कझाकस्तान, किरगिझस्तान, मोल्दोव्हा, सॅन मरिनो, ताजिकिस्तान, तुर्कमेनिस्तान, उझबेकिस्तान देश युनायटेड नेशन्स मध्ये सामील झाले.
२००१: मध्य अफगाणिस्तानातील बामिया शहराजवळ प्राचीन आणि अमूल्य ठेवा असलेल्या सुमारे ६,००० बुद्ध मूर्ती धर्मबाह्य ठरवून मूलतत्त्ववादी तालिबानने उखळी तोफा आणि रणगाड्यांच्या साहाय्याने उद्ध्वस्त करण्यास सुरूवात केली.
२००६: आजच्या दिवशी दिल्ली येथे अमेरिका आणि भारत या दोन राष्ट्रांमध्ये आण्विक करार झाला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७४२: विश्वासराव पानिपतच्या ३ र्या युद्धात मारले गेलेले नानासाहेब पेशव्यांचे ज्येष्ठ चिरंजीव (मृत्यू: १४ जानेवारी १७६१)
१९२५: शांता जोग चित्रपट व रंगभूमीवरील अभिनेत्री (मृत्यू: १२ सप्टेंबर १९८०)
१९२६: केरळ चे माजी मुख्यमंत्री पी. के. वासुदेवन नायर यांचा जन्म.
१९३१: मिखाईल गोर्बाचेव्ह सोविएत संघाचे शेवटचे अध्यक्ष आणि नोबेल पारितोषिक विजेते
१९३१: राम शेवाळकर मराठी साहित्यिक (मृत्यू: ३ मे २००९)
१९५१: असे भारतीय जे हॉलीवूड चित्रपटांना सुद्धा आवाज देतात किशोर भट्ट यांचा जन्म.
१९७३: भारतीय चित्रपट अभिनेत्री विद्या मालवडे यांचा जन्म.
१९७७: अँड्र्यू स्ट्रॉस इंग्लिश क्रिकेटपटू
१९८६: भारतीय तिरंदाज जयंत तालुकदार यांचा जन्म.
१९९०: भारतीय चित्रपट अभिनेता टायगर श्रॉफ यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१५६८: मीरा रत्नसिंह राठोड ऊर्फ संत मीराबाई
१७००: मराठा साम्राज्याचे तिसरे छत्रपती राजाराम महाराज यांचे सिंहगडावर निधन (जन्म: २४ फेब्रुवारी १६७०)
१९३०: डी. एच. लॉरेन्स इंग्लिश कादंबरीकार, कवी, नाटककार, टीकाकार आणि चित्रकार (जन्म: ११ सप्टेंबर १८८५)
१९३८: उत्तर प्रदेश चे पहिले राज्यपाल हार्कोर्ट बटलर यांचे निधन.
१९४९: सरोजिनी नायडू प्रभावी वक्त्या, कवयित्री व स्वातंत्र्यसेनानी, रौलेट कायदा, मॉन्टेग्यू चेम्सफर्ड सुधारणा, खिलाफत चळवळ, साबरमती करार, असहकार आंदोलन यांत त्यांचा सक्रिय सहभाग होता. (जन्म: १३ फेब्रुवारी१८७९)
१९८६: डॉ. काशिनाथ घाणेकर मराठी रंगभूमी आणि चित्रपटातील अभिनेते (जन्म: १४ सप्टेंबर १९३२)
१९९४: पं. श्रीपादशास्त्री जेरे धर्म व अध्यात्माचे गाढे अभ्यासक, करवीरभूषण, वेदशास्त्रसंपन्न

## उन्हाळी हंगामातीतील मूग, बाजरीची पेरणी कशी करावी?

उन्हाळी हंगामातील पेरणीची योग्य वेळ अतिशय महत्वाची असते. उन्हाळी पिकांची पेरणी लवकर केल्यास त्याचा पीक उगवणीवर व पिकाच्या वाढीवर विपरीत परिणाम होता,तर पिकांची पेरणी उशिरा झाल्यास अतिउष्णतेचा विपरीत परिणाम फुलोऱ्यावर तसेच दाणे भरण्यावर होऊ शकतो. तसेच मे महिन्याच्या शेवटी होणाऱ्या अवकाळी पावसात काढणीच्या वेळी पीक सापडू शकते म्हणून उन्हाळी हंगामातील पिकांची योग्य वेळी पेरणी करणे आवश्यक आहे.

उन्हाळी मूग: उन्हाळी मुगाची पेरणी फेब्रुवारीचा शेवटचा आठवडा ते मार्चचा पहिला पंधरवडा या काळात पेरणी करावी.त्यापेक्षा लवकर पेरणी केल्यास थंडीचा उगवणीवर परिणाम होतो.उशिरा पेरणी केल्यास पीक मान्सूनच्या पावसात सापडण्याची शक्यता असते. पेरणी दोन चाड्याच्या पाभरीने करावी.पेरणी करताना दोन ओळीतील अंतर ३० से.मी. व दोन रोपातील अंतर १० से.मी. ठेवावे.हेक्टरी १५ ते २० किलो बियाणे वापरावे. उन्हाळी मुगाच्या पेरणीसाठी पुसा वैशाखी,वैभव,पी.कें.व्ही ग्रीन गोल्ड, एस-८, फुले एम-२,बीपीएमआर १४५, उत्कर्ष, फुले सुवर्ण या वाणांची निवड करावी सर्वसाधारणपणे हे वाण ६५ ते ७० दिवसात तयार होतात.

पेरणी पूर्वी प्रथम कार्बेन्डॅझिम ३ ग्रॅम/किलो अथवा ५ ग्रॅम/किलोची बीजप्रक्रिया करावी.त्यानंतर जीवाणू खतांची रायझोबियम व स्फुरद विरघळवणारे जीवाणू यांची २५ ग्रॅम /किलो याप्रमाणे बीजप्रक्रिया करावी.बीजप्रक्रिया केल्यानंतर बियाणे सावलीत सुकवावे आणि नंतर पेरणी करावी. पेरणीपूर्वी पूर्ण कुजलेले शेणखत ६ ते ८ टन प्रति हेक्टरी कुळवणीच्या वेळी द्यावे.पेरणी करते वेळी २० किलो नत्र व ४० किलो स्फुरद अथवा १०० किलो डीएपी प्रति हेक्टरी द्यावे.पीक फुलोऱ्यात असताना २ % युरिया (२० ग्रॅम प्रति लिटर पाण्यात मिसळून) ची फवारणी करावी.शेंगा भरताना २ % डीएपी (२० ग्रॅम प्रति लिटर पाण्यात मिसळून)ची फवारणी करावी.

उन्हाळी बाजरी : उन्हाळी बाजरीची पेरणी १५ जानेवारी ते १५ फेब्रुवारी या दरम्यान करावी.पेरणी १५ फेब्रुवारी या दरम्यान करावी.पेरणी १५ फेब्रुवारी नंतर झाल्यास परागीभवनावर पुढील काळातील अतिउष्ण हवामानाचा अनिष्ट परिणाम होऊन दाणे कमी प्रमाणात भरून उत्पादन घटते.पेरणी दोन चाडाच्या पाभारीच्या साहय्याने ३० १५ से. मी.अंतरावर पेरणी करावी पेरणी २ ते ३ से. मी पेक्षा जास्त खोलीवर पेरणी करू नये.पेरणीसाठी हेक्टरी ३ ते ४ किलो बियाणे पुरेसे होते. उन्हाळी बाजरीच्या पेरणीसाठी संकरीतवाण-आदिशक्ती ,फुले महाशक्ती ,५५८,सुधारित वाण:धनशक्ती,-२२१, खाजगी कंपनीचे ८६ एम ६४, ८६ एम ८६ ४७६७,प्रताप कावेरी सुपर बॉस हे वाण पेरणीकरिता वापरावेत. अरगट रोगाच्या नियंत्रणासाठी २०% मिठाच्या द्रावणाची बीज प्रक्रिया करावी.,त्यासाठी १० लिटर पाण्यांत २ किलो मीठ विरघळावे.गोसावी रोगाच्या नियंत्रणासाठी बियाण्यास मेटॅलॅक्झील (३५ एस डी) ६ ग्रॅम प्रति किलो बियाण्यास चोळावे. त्यानंतर जीवाणू संवर्धनाची बीजप्रक्रिया करावी अझोस्पिरीलम/ॲझोटोबॅकटर २५ ग्रॅम + स्फुरद विरघळवणारे जीवाणू यांची २५ ग्रॅम /किलो याप्रमाणे बीजप्रक्रिया करावी.बीजप्रक्रिया केल्यानंतर बियाणे सावलीत सुकवावे आणि नंतर पेरणी करावी पेरणी करताना ४५ किलो नत्र ४५ किलो स्फुरद व ४५ किलो पालाश द्यावे. उर्वरीत ४५ किलो नत्र २५ ते ३० दिवसांनी खुरपणी केल्यानंतर द्यावे.



# ग्रामपंचायत सदस्यासह युवकांचे मोबाईल टावरवर चढून आंदोलन

## लेखी आश्वासनानंतर आंदोलन मागे : आर्वी गावातील जलजीवन पाणीपुरवठा योजना प्रकरण

शिरूर । प्रतिनिधी

तालुक्यातील आर्वी या गावासाठी मंजूर जलजीवन पाणीपुरवठा योजनेचे काम नियमबाह्य होत असून योजना थातूरमातूर करून ग्रामस्थांच्या तोंडाला पान पुसण्याचा प्रकार चालू असल्याने ग्रामपंचायत सदस्यांकडून प्रशासनाला अल्टिमेटम देऊन मोबाईल टावर वर चढून आत्मदहन करण्याचा इशारा एक महिन्यापूर्वी प्रशासनाला दिला होता प्रशासनाकडून यावर कुठलेही कार्यवाही न केल्याने युवक आंदोलनावर ठाम राहिले व एक मार्च च्या रोजी सकाळी युवक टावर वर चढले होते.

बोगस जलजीवन पाणीपुरवठा योजनेची चौकशी करून योजना दर्जेदार करावी व योजनेतून टाळलेल्या वस्त्यांवर पाणीपुरवठा पाईपलाईन करावी या मागणीसाठी ग्रामपंचायत सदस्यांनी प्रशासनाच्या विरोधात आंदोलनाचे हत्यार उपसले होते एक मार्च रोजी सकाळी नऊ वाजण्याच्या सुमारास ग्रामपंचायत मधील सदस्य गोपाल भुसारे, गणेश भोसले,अरुण देवकाते, बळीराम मंडलिक, बप्पासाहेब



काळे, उपसरपंच अरुण कुंभारकर सह रामेश्वर नागरगोजे, आयुब शेख व नितीन घरगिने हे युवक मोबाईल टावर वर चढले होते तब्बल तीन तासानंतर प्रशासकीय अधिकारी या ठिकाणी दाखल झाले होते, आंदोलन स्थळावर सरपंच मीरा यादव, ग्रामसेविका सीमा खेडकर, शिरूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक गणेश धोकृट, बिट अंमलदार जोगदंड यांच्यासह नायब तहसीलदार शिवनाथ खेडकर हे सर्व अधिकारी सकाळी नऊ वाजल्यापासून आंदोलन स्थळावर तळ ठोकून होते. पावणे बारा वाजण्याच्या सुमारास प्रशासकीय अधिकारी या ठिकाणी आले व आंदोलकांची समजूत काढून लेखी आश्वासन देऊन आंदोलन मागे घेण्यात आले.

### एक महिन्याचा मागितला कालावधी

आर्वी गावातील जलजीवन योजनेचे रखडलेले काम पूर्ण करण्यासाठी ग्रामीण पाणीपुरवठ्याचे उपअभियंता शेख एम.ए, सातपुते एन.बी,एल डी हूले, या अधिकाऱ्यांनी संबंधित गुत्तदाराला सूचना देऊन रखडलेले काम पूर्ण करण्यासाठी एक महिन्याचा अवधी आंदोलनकर्त्याकडून लेखी स्वरूपात घेतलेला आहे प्रशासकीय अधिकाऱ्यांनी एक महिन्याच्या आत गावचा पाणीपुरवठा सुरळीत करण्याची संमती यावेळी दिली.

### गुत्तेदाराची आंदोलनाकडे पाठ

बीड विधानसभा मतदार संघाचे लोकप्रतिनिधी संदीप क्षीरसागर यांचे निकटवर्तीय असलेले गुत्तेदार जालिंदर डावकर यांनी या युवकांच्या आंदोलनाकडे पाठ फिरवली हे आंदोलनाकडे फिरकले देखील नाही यामुळे ग्रामस्थांच्या मनात गुत्तेदारा विरोधात तीव्र संतापाची लाट यावेळी पाहण्यासाठी मिळाली.

### दीपक नागरगोजे यांनी अधिकाऱ्यांना धरले धारेवर

आर्वी ग्रामपंचायत चा कारभार जेष्ठ समाजसेवक दीपक नागरगोजे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे गावातील जलजीवन पाणीपुरवठा योजनेस संदर्भात चक्क ग्रामपंचायत सदस्यांना आंदोलनाची वेळ येत असेल तर प्रशासकीय अधिकारी करतात तरी काय असा सवाल ज्येष्ठ समाजसेवक दीपक नागरगोजे यांनी आंदोलन स्थळावर उपस्थित अधिकाऱ्यांना विचारून धारेवर धरले होते.

# कोरटकर विरोधात लिंबागणेशकरांचे जोडे मारो आंदोलन



लिंबागणेश। प्रतिनिधी

रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज , राजमाता जिजाऊ यांच्या बद्दल आक्षेपार्ह व बदनामीकारक वक्तव्य करून शिवप्रेमींच्या भावना दुखावणा-या नागपुरच्या प्रशांत कोरटकर यांना तात्काळ अटक करून त्यांच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्यात यावा यासाठी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली आज दि. ०१ शनिवार रोजी सकाळी ११ वाजता लिंबागणेश येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात जोरदार घोषणाबाजी करत प्रशांत कोरटकर यांच्या प्रतिमेला जोडे मारून निषेध व्यक्त करण्यात आला.ईतिहास संशोधक इंद्रजित सावंत यांना मोबाईल वरून धमकी देताना प्रशांत कोरटकर यांने महाराष्ट्राची अस्मिता असलेले रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज व राजमाता जिजाऊ यांच्या बद्दल हिनकस वक्तव्य केले असुन दोन समाजात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न देखील केला आहे.तसेच विकृत लेखक जेम्स लेन यांनी छत्रपती शिवाजी महाराज व राजमाता जिजाऊ यांच्या बद्दल अत्यंत विकृत लिखाणाचे समर्थन करून तमाम शिवप्रेमींच्या भावना दुखावल्या आहेत. मराठा समाजाला शिविगाळ करून समाजामध्ये तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे तसेच ईतिहास संशोधक इंद्रजित सावंत यांना जीवे मारण्याची धमकी दिली आहे. महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्र्याचे नाव घेऊन सदर व्यक्तीने हे वक्तव्य करत धमकी दिल्यामुळे हे प्रकरण अत्यंत संवेदनशील असुन तातडीने कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांना जिल्हाधिकारी, पोलिस अधीक्षक बीड यांच्या मार्फत करण्यात आली आहे. यावेळी आंदोलनात राजेभाऊ आप्पा गिरे, सरपंच बालासाहेब जाधव, सेवा सोसायटी चेअरमन रविंद्र निर्मळ, सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती अध्यक्ष अशोक वाणी, विक्रांत वाणी,अॅड.गणेश वाणी,बाळकृष्ण थोरात, भगवान मोरे ,लक्ष्मण वाणी, भालचंद्र गिरे, दादा गायकवाड, नामदेव वाणी, सौरभ जाधव,रत्नाकर वाणी,संजय पावले, अशोक जाधव,पांडुरंग कानडे , कृष्णा कानडे, हनुमंत निर्मळ आदी सहभागी होते.

# महात्मा ज्योतीबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त आज बैठक

जालना । प्रतिनिधी

क्रांतीसुर्य महात्मा ज्योतीबा फुले यांची १९८ वी जयंती व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ व्या जयंतीनिमित्त जूना जालना, सावता माळी सभागृह, राजारामनगर जालना शहर महापालिकेच्या पाठीमागे जालना येथे दि. २ मार्च २०२५ रोजी दुपारी १२.३० वाजता बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.या बैठकीत महात्मा फुले जयंती व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त व्याख्यानमाला, महात्मा फुले यांच्या जीवनावर नाट्यस्पर्धा, महात्मा फुले यांच्या जीवनचरित्र्यावर पवाडे, लाडु वाटप आदि कार्यक्रम करण्याबाबतच्या नियोजनासाठी ही बैठक बोलविण्यात आली आहे. यावेळी महात्मा ज्योतीबा फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार देण्याबाबत व ओबीसीला समाजाला सावित्री आई घरकुल योजना लागु करावी, यासाठी मागणी करण्यात येणार आहे. तसेच माळी समाजासाठी सावित्रीआई फुले महामंडळ स्थापन करायचे याबाबत चर्चा करण्यात येणार आहे. तसेच महात्मा ज्योतीबा फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त सार्वजनिक सुट्टी व मद्यपान बंद ठेवावे आदिबाबत चर्चा करण्यात येणार आहे.

या बैठकीस अखिल भारतीय महात्मा समता परिषद सर्व पदाधिकारी, सदस्य, माळी महासंघ, सर्व पदाधिकारी, सदस्य, सावता परिषद सदस्य पदाधिकारी, आंबेडकर अनुयायी, ओबीसी समाजातील पदाधिकारी, भटक्या, विजेएनटी,एनटी पदाधिकाऱ्यांनी व सदस्यांनी उपस्थित रहावे असे आवाहन भास्करराव अंबेकर, अश्विन अंबेकर, बाबासाहेब शिवाजी वानखेडे, डॉ. विशाल धानुरे, प्रा.राजेंद्र जाधव, अमोल धानुरे, गोकुळ स्वामी, दीपक वैद्य, सुधाकर निकाळजे, शेख इब्राहिम, सुनिल रत्नपारखे, शिवलाल अक्षय, बाबा पठाण,सुरेश रत्नपारखे, संतोष जमधडे,अमरदीप शिंदे, नितीन तायडे,मधुकर झरेकर, सुंदरराव कुदळे, बाबासाहेब सोनवणे, योगेश रत्नपारखे, निखील पगारे, गजानन खांडेभराड, राजेंद्र शिंदे, स्वप्नील गायकवाड, संदीप हिवराळे, इब्राहिम शेख, गणेश तरासे, बाबुराव मामा सतकर, मा. जि.प. सदस्य बबनराव खरात, संतोष परळकर, मगरे टेलर, गवई, राजेश मगरे, आबा पाटील, वरखेडचे सरपंच सर्जेराव शेवाळे,आसाराम रायकर, सागर राऊत, कुंभेफळचे सरपंच सुधाकर खरात, प्रभाकर घडलिंग, संतोष पाटील खरात, राहुल रायकर, नंदकुमार जाधव, देवनाथराव जाधव, डॉ. सुशिल धानुरे, डॉ. श्रावण शेवाळे, रामदास शेवाळे शिक्षणाधिकारी बाबासाहेब खरात, विशाल वाघमारे, सदाशिव वाघमारे, बाबासाहेब गाडेकर, प्रभाकर खरात, संजय खरात ,मदन खरात, बंडु पाऊलबुध्दे, शिवनाथ पाऊलबुध्दे,विलास राऊत, संतोष राऊत, रमेश मुळे, रामेश्वर गाडेकर,अर्शद बागवान, बाळु देशमुख,किशोर मघाडे, सचिन पगारे, बाबासाहेब गाडेकर, दत्ता खांडेभराड, वैजीनाथ नागरे, अॅड. रामेश्वर खांडेभराड,परमेश्वर खांडेभराड, अनिल वाघमारे, अॅड. राजाळे, अॅड. दैणे, लक्ष्मण इधाटे, शिवाजी घायाळ, बंडु जाधव, शंकर घोडके, शंकर सातपुते, ऋषीधंर राऊत, निलेश वानखेडे, सचिन जैवळ, सचिन वानखेडे, दिलीप पाऊलबुध्दे, सतीश खांडेभराड, पंडीत जाधव, जनार्धन जाधव, आशिष वैद्य, लक्ष्मण गडकरी, रमेश गडकरी, गोविंदराव बारवकर, अशोक खांडेभराड, नितीन इंगळे, धरम इंगळे, रामभाऊ जाधव, सय्यद अखिल, महेंद्र शिंदे, दशरथ तोंडुळे, आसाराम राठोड, सलमान शेख, महासंघाचे अध्यक्ष मुस्ताक बेग (जॉनी), बाबासाहेब खांडेभराड, फुलझाडे, रघुनाथ मगर, सुरेश दांडगे, दगडु बडदे, राहुल मुळे, प्रा बुलबुले, शिवलाल घाडगे, सतिश फत्तेपुरीये, सिध्दार्थ पवार, गणेश जाधव आदिंनी केले आहे.

# संस्कार इंग्लिश स्कूल चौसाळा येथे वार्षिक स्नेहसंमेलन

चौसाळा। प्रतिनिधी

आजच्या धकाधकीच्या काळात व्यक्तींना मनोरंजनाची गरज असते जर हे मनोरंजन आपल्याच मुलानं कडून होत असेल तर हा दुग्ध शर्करा योगच म्हणायचा.असाच योग चौसाळा येथील संस्कार इंग्लिश स्कूल च्या वार्षिक स्नेहसंमेलनात आला. देवा श्रीगणेशा ने सुरुवात होऊन,काय सांगू राणी मला गाव सुटेना,आपली यारी, पाटलांचा बैलगाडा,सांगा ना कशी दिसते मी,सपने साजन के या गीतावर टिपरी डान्स,माझ्या ढवळ्या नी पवळ्याची या सारखे शेतकरी गीत,स्त्री भ्रूण हत्या वर आधारीत नाटक, खंडोबाची कारभारीन झाली बानू धनगरीन आंबाबाईचा गोंधळ या सारख्या देवाच्या गीता बरोबरच नटरंग उभा, कुण्या गावाचं आल पाखरू अशी महाराष्ट्राच्या लोककला असलेली



लावणी या सारख्या गीतांनी कार्यक्रमाची शोभा वाढवत नर्सरी पासून सहावी पर्यंत च्या या विद्यार्थ्यांनी प्रेक्षकांची वाहवा मिळवली.

सदरील कार्यक्रमाचे उद्घाटन सरपंच श्री. बाबुशेठ लोढा , मा. जि. प.सदस्य भीमराव विधाते यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने करण्यात आले या वेळी पत्रकार तथा ग्रा.पं. सदस्य विकास नाईकवाडे,संस्थेचे अध्यक्ष तुकाराम माळकर,उपाध्यक्ष लक्ष्मण तोडकर,कोषाध्यक्ष विकास तोडकर, मुख्याध्यापिका मीनाक्षी माळकर,संतोष तोडकर,अशोक लिंगे, वाघमारे, पत्रकार विकास सर्वज्ञ, सुरेश तोडकर ,साईनाथ गावडे सर उपस्थित होते.सदरील कार्यक्रम शाळेतील सर्व शिक्षकांच्या अथक परिश्रमातून पार पडला.

# जायकवाडीच्या पाण्यासाठी उद्यापासून सिरसमार्ग येथे उपोषण

## शेतकऱ्यांनी सहभागी व्हावे

बीड । प्रतिनिधी

जायकवाडीचे पाणी सिंदफणा नदी पात्रात सोडावे यासह इतर मागण्यांसाठी सिंदफणा पट्ट्यातील १४० गावातील शेतकऱ्यांनी एकत्र येत लोकलढा आंदोलन सुरू केले आहे. या आंदोलनाचा एक भाग म्हणून उद्यापासून सिरसमार्ग (ता. गेवराई) येथे उपोषण करण्यात येत आहे. या आंदोलनात शेतकर्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन लोकलढा आंदोलकांनी केले आहे.

शिरूर ते माजलगाव पर्यंत सिंदफणा नदीपात्र आठ महिने कोरडे असते. त्यामुळे या पट्ट्यातील शेतकऱ्यांना सतत पाणीटंचाई व दुष्काळाला सामोरे जावे लागते. हा दुष्काळ दूर करण्यासाठी व सिंदफणा पाणीदार करण्यासाठी शेतकर्यांनी लोकलढा उभारला आहे. आंदोलक शेतकरी उद्या सोमवार (दि.तीन) पासून सिरसमार्ग येथील हनुमान मंदिर येथे उपोषणास बसणार आहेत. हे उपोषण सकाळी १० पासून सुरू होणार आहे. उपसा सिंचन योजना राबवून जायकवाडी धरणाचे पाणी सिंदफणा नदी पात्रात सोडावे, सिंदफणा नदीवर साखळी बंधारे बांधावेत, मराठवाडा वॉटर ग्रीड योजना गतीने राबवावी, उपकालवा करावा आदी मागण्यांसाठी हे आंदोलन सुरू आहे. या आंदोलनात सिंदफणा पट्ट्यातील व इतरही शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन लोकलढा आंदोलनातील समन्वयकानी केले आहे.

# भारतीय संविधान जगात अद्वितीय - प्रा.लोखंडे

पाटोदा। प्रतिनिधी

भारतीय संविधान सर्वसामान्यांच्या हक्कांचे रक्षण करते. प्राचीन काळातील भारतीय मूल्यांचा आधार घेऊन तसेच जगातील विविध राज्यघटनांचा अभ्यास करून भारतीय समाजाच्या कल्याणासाठी उपयुक्त अशी तत्वे स्विकारुन भारतीय राज्यघटनेची निर्मिती करण्यात आली आहे म्हणून भारतीय राज्यघटना ही जगात अद्वितीय आहे असे प्रतिपादन जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळाच्या कला व विज्ञान महाविद्यालयाचे राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. बी. बी. लोखंडे यांनी केले. येथील वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात भारतीय राज्यघटनेच्या ७५ वर्षपूर्तीनिमित्त संविधान गौरव महोत्सव उपक्रमाअंतर्गत 'भारतीय संविधान' या विषयावर २५ फेब्रुवारी रोजी आयोजित विशेष व्याख्यानात ते अतिथी व्याख्याते म्हणून बोलत होते.

महाविद्यालयाच्या राज्यशास्त्र व लोकप्रशासन विभागांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे होते. व्यासपीठावर राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. उमाकांत वानखेडे, लोकप्रशासन विभागप्रमुख प्रा. शरद पवार उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. उमाकांत वानखेडे यांनी केले. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य आबासाहेब हांगे म्हणाले की, भारतीय संविधानात नागरिकांचे मूलभूत अधिकार व कर्तव्ये यांचा समावेश आहे.

# बीज सोहळ्यानिमित्त संगीतमय श्रीमद्भागवत कथा सोहळा

बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील नांदूर फाटा जवळील खर्डेवाडी ता. जि.बीड येथे प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी पाचवा वेद निर्माते जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज यांचा बीजसोहळा मोठ्या उत्साहात साजरा होणार आहे या बीज उत्सवानिमित्त दि.०९/३/२०२५ रोजी संगीतमय श्रीमद्? भागवत कथा ज्ञान यज्ञ सोहळा प्रारंभ होणारआहे .या संगीतमय श्रीमद्? भागवत कथा प्रवक्त्या ह.भ.प. सौ.साक्षीताई कराडकर सद्गुरु बंकट स्वामी संस्थान आळंदी देवाची या आहेत . कथा वेळ दुपारी १ ते ५ आहे.सात दिवस चालणाऱ्या भक्ती ज्ञान यज्ञ सोहळ्यात सकाळी काकडा भजन, दुपारी भागवत कथा व संध्याकाळी सहा ते सात या वेळेत भजनी मंडळ खर्डेवाडी यांचा हरिपाठ व रात्री परिसरातील गावकऱ्यांचा हरिजागर होणार .या संगीतमय भागवत कथेसाठी तबलासाथ ह.भ.प.श्री.राम महाराज गायकवाड, सिंथवादन व गायन ह.भ.प.श्री.तुकाराम महाराज कराडकर, गायन साथ ह.भ.प. शालिनीताई जाधव , बीड, ऑक्टोपॅड वादन श्री. रवी महाराज हिंगोली यांची आहे.

या सप्ताहात गुरुवार दिनांक १३/३/२५ होळीनिमित्त व कै. रत्नदीप कळेकर यांच्या तेराव्या पुण्यस्मरणानिमित्त ह.भ.प.श्री.भरत महाराज साळुंके ज्ञानराज वारकरी शिक्षण संस्था मंठा जिल्हा जालना यांचे रात्री ९ते ११ कीर्तन सेवा होणार आहे. तसेच शनिवार दिनांक १५/३/२५ ला ह.भ.प. श्री तुकाराम महाराज करडकर यांचे हरिकिर्तन होईल रविवार दिनांक १६/३/२५ तुकाराम बीज उत्सव व श्रीमद संगीत भागवत कथेची सांगता निमित्ताने सकाळी ९ ते दहा ग्रंथ दिंडी प्रदक्षिणा त्यानंतर सकाळी ११ ते १ या वेळेत ह.भ.प.श्री राजेन महाराज भोसले यांचे काल्याचे किर्तन होईल नंतर महाप्रसाद वाटप होणार आहे तसेच वैष्णव भक्तांचा आणि सेवेकरांचा कळेकर परिवाराच्या वतीने सन्मान होणार आहे तरी या संपूर्ण ज्ञानयज्ञ सोहळ्यात श्रवणाची पर्वणी मिळणारं असून परिसरातील भाविक भक्तांचे सहकार्य लाभणार आहे तरी सर्व भावीक भक्तांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन कथेचे आयोजक समस्त कळेकर परिवार खर्डेवाडी यांनी केले आहे.

# संस्कारक्षम बालवयातच मुला मुलीवर लक्ष दिले पाहिजे-पांचाळ

## मानसिकदृष्ट्या सक्षम व्हा तणाव घेऊ नका-नोपाणी

जालना। प्रतिनिधी

जालना शहरातील शांतिनिकेतन विद्यामंदिरचे दोन दिवस वार्षिक वार्षिक संमेलन झाले. या कार्यक्रमाचे उद्घाटन अश्विनी श्रीकृष्ण पांचाळ यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर सौ. निधी अजयकुमार बंसल, सौ. मानसी आयुष नोपानी यांच्यासह समर्थ शिक्षण प्रसारक मंडळाच्या संचालिका शोभाताई अंबेकर यांची उपस्थिती होती. यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या विद्यार्थी व पालकांना मार्गदर्शन करताना सौ. पांचाळ म्हणाल्या की, शाळा विद्यार्थ्यांना घडविण्याचे सातत्याने प्रयत्न करीत असते. परंतु केवळ शाळेवरच अवलंबून न राहता संस्कारक्षम अशा या शालेय बालवयात पालकांनी आपल्या पाल्यावर लक्ष देऊन त्यांच्यावर अत्यंत चांगले संस्कार रुजावेत यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले पाहिजेत. आजचे युग हे स्पर्धेचे असल्याने प्रत्येक पालकाला आपल्या पाल्याकडून मोठ्या प्रमाणावर अपेक्षा असतात. या अपेक्षांची पूर्तता व्हावी याकरिता अत्यंत बालवयापासून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळेबरोबरच पालकांनी जाणीवपूर्वक लक्ष दिले पाहिजे. मानवाच्या जीवनामध्ये शालेय जीवनाला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे शाळेमध्ये असतानाच



आपल्या व्यक्तिमत्वाला योग्य पैलू पाडून विद्यार्थी घडविण्याचे काम शिक्षक करीत असतात. उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना शुभेच्छा देऊन अत्यंत नेटक्या कार्यक्रमाच्या आयोजनबद्दल त्यांनी शाळेचे कौतुक केले.

कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी मानसिक समुपदेशक मानसी नोपानी यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्या म्हणाल्या की, प्रत्येक मूल हे मानसिकदृष्ट्या सक्षम झाले पाहिजे. त्याच्यावर कुठलाहीयासाठी शिक्षक व पालकांनी प्रयत्न करावेत. आपल्या भावना त्याला व्यक्त करण्याची संधी दिली पाहिजे. त्यांनी त्या दाबून ठेवल्यास त्याचे विपरीत परिणाम त्याच्या व्यक्तिमत्त्वांमध्ये त्याचप्रमाणे आयुष्यामध्ये दिसून येतात. बऱ्याच वेळा विद्यार्थी अभ्यास करतात परंतु अपेक्षित यश न मिळाल्यामुळे त्यांच्यामध्ये नैराशाची भावना निर्माण होते. तर अशा या निराशामय वातावरणात पालकांनी आपल्या विद्यार्थ्यांना समजून घ्यावे व त्यांना योग्य पाल्यावर असे मार्गदर्शन करावे. त्यांचे मनोबल तुटू नये यासाठी प्रयत्न करावेत. त्याचबरोबर विद्यार्थ्यांची कुवत व क्षमता लक्षात घेऊनच पालकांनी त्यांच्याकडून अपेक्षा ठेवाव्यातात. चुकीच्या अपेक्षा ठेवल्यास व त्याची पूर्तता न करता आल्यास पाल्याला त्यामुळे निराशा निर्माण होते व पर्यायाने चुकीच्या गोष्टीकडे त्याची पाऊल वळतात. त्यामुळे विद्यार्थी व पालक यांचे नाते अत्यंत मित्रत्वाचे असावे. प्रत्येक गोष्टीवर विद्यार्थ्यांनी व पालकांनी संकोच न बाळगता चर्चा करावी. पाल्याच्या समस्या जाणून घ्याव्यात. जेणेकरून विद्यार्थी तणाव मुक्त राहून योग्य प्रकारे मार्गक्रमण करू शकेल. तसेच विद्यार्थ्यांना रोज शारीरिक आयोग आरोग्याबरोबरच मानसिक आरोग्य चांगले राहावे यासाठी योगा, प्राणायाम, ध्यान यासारखे मार्ग अवलंबवावेत. विद्यार्थी व पालकांना त्यांनी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या त्याचबरोबर शाळेने चांगल्या कार्यक्रमाचे आर्याजन केल्याबद्दल शाळा व व्यवस्थापनाचे त्यांनी कौतुक केले. याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित असलेल्या निधी बंसल यांनीही विद्यार्थ्यांना समयोचित मार्गदर्शन केले.

विद्यार्थ्यांनी स्पर्धा लक्षात घेऊन आतापासूनच चांगल्या पद्धतीने अभ्यास करावा. पालकांनीही त्यांच्या अभ्यासावर लक्ष द्यावे. असे आवाहन करून विद्यार्थ्यांना उज्वल भवितव्यासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे अध्यक्षा सौ. शोभाताई अंबेकर यांनीही उपस्थित पालकांना मार्गदर्शन केले. मोठ्या प्रमाणावर विद्यार्थ्यांनी स्नेहसंमेलन कार्यक्रमात सहभाग नोंदवल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले. त्याचबरोबर विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनामध्ये कोणती ना कोणती कला अवश्य जोपासावी. या कलेच्या माध्यमातून आयुष्य सुखकर होते असेही त्या म्हणाल्या. तसेच शांतिनिकेतन शाळा ही उत्तरोत्तर चांगल्या दर्जाचे शिक्षण देत असून भविष्यातही शाळेच्या वतीने अत्यंत चांगल्या प्रकारे सोयीसुविधा उपलब्ध करून विद्यार्थ्यांच्या दर्जेदार शिक्षणासाठी प्रयत्न करण्यात येतील. असेही त्यांनी यावेळी बोलताना सांगितले. स्नेहसंमेलनाच्या दुसऱ्या दिवशी संस्थेचे अध्यक्ष तथा शिवसेना जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर यांनी विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले. पुढे बोलता अंबेकर म्हणाले की, शांतिनिकेतन शाळेच्या माध्यमातून मातून समाजातील सर्व स्तरातील व गोरगरीब विद्यार्थ्यांना ज्ञानदान देण्यासाठी शाळेच्या माध्यमातून सातत्याने प्रयत्न करण्यात येत आहेत. गुणवत्ता पूर्ण शिक्षण मिळावे याकरिता संस्था सातत्याने प्रयत्न करते. तसेच आगामी काळातही शाळेच्या वतीने विद्यार्थ्यांना गुणवत्ता व दर्जेदार शिक्षण याचबरोबर चांगल्या भौतिक सुविधा मिळाव्यात याकरिता सातत्याने प्रयत्न करण्यात येतील असे सांगून सर्व विद्यार्थ्यांना स्नेहसंमेलनाच्या निमित्ताने मनःपूर्वक शुभेच्छा व्यक्त केल्या. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीतांचे गायन, भजन, भारुडे, पोवाडे, गवळणी, लोकगीते सादर करून त्यावर यावर बहारदार नृत्य सादर केले. आपले कलागुण सादर करून विद्यार्थ्यांनी उपस्थित प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक ज्ञानेश्वर गाढवे, माध्यमिकच्या मुख्याध्यापिका, प्रेमला पंडित, यांच्यासह शिक्षक सूर्यकांत बेले, अशोक माधवले मोहन भदाडे, अमोल पवार, गजानन दळवी, अर्चना भालेराव, शिवराम गिराम, पल्लवी खरात, सुनील जाधव, पुरुषोत्तम चौरे, कीर्ती खैरे, अनिता जाधव, अंबादास घायाळ, संदीप वाखारकर, रमेश गाढवे, सीमा इंगळे, अरुणा मांटे, कांचन वाघ, सुमित्रा शर्मा, रामकिसन मोहिते, स्वाती काकडे, विद्या चौधरी, गायत्री सूर्यवंशी, किशोर शेळके, संजय खरात, वसंत गाडेकर, कल्याणी काळे, तुकाराम चव्हाण आदींनी प्रयत्न केले.

# आमदार प्रकाशदादा सोळंके यांच्या प्रयत्नातून वडवणी शहरात ५ कोटी रुपयांची नगरपंचायत प्रशासकीय इमारत

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी नगरपंचायत ची स्थापना २०१५ साली झाली परंतु नगरपंचायतचा कारभार आजही जुन्या ग्रामपंचायतच्या इमारतीतूनच चालत आहे, या जुन्या इमारती मध्ये नगरपंचायतचे कामकाज करण्यास अडचण येत असून सर्व विभागांचे कामकाज करण्यासाठी या इमारतीसह बचतगट भवनातून कारभार बघण्यात येत आहे , ही अडचण लक्षात घेऊन माजलगाव मतदार संघाचे लोकप्रिय आमदार प्रकाश दादा सोळंके यांनी नगरपंचायत राष्ट्रवादी काँग्रेस व आघाडीच्या ताब्यात आल्यानंतर वडवणी शहरासाठी भरघोस निधी मंजूर करून घेतला यामध्ये नगरपंचायतची प्रशासकीय इमारतीसाठी पाच कोटी रुपये निधी उपलब्ध करून दिला आणि आज या इमारतीचे वडवणी नगरपंचायतच्या बाजार तळातील जागेत शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी बांधकाम होत असून या बांधकामाचा शुभारंभ नगराध्यक्ष शेषेराव जगताप, उपनगराध्यक्ष बन्सी भाऊ मुंडे, सभापती






## सर्व नगरसेवकांच्या उपस्थितीत बांधकामाचा शुभारंभ संपन्न

संभाजी तात्या शिंदे, माजी नगराध्यक्ष राजाभाऊ आण्णा मुंडे, माजी जि.प.सदस्य सर्जेराव महाराज आळणे, यांच्यासह सर्व नगरसेवकांच्या उपस्थितीत संपन्न झाला, या इमारतीचे बांधकाम अतिशय जलद गतीने व उत्कृष्ट दर्जाचे करून ही इमारत एक वर्षात पूर्ण करण्यात येईल व पुढच्या वर्षी या इमारतीचे लोकार्पण आमदार प्रकाशदादा सोळंके यांच्या हस्ते करुन वडवणी करांच्या सेवेत पुढील वर्षीपासून नगरपंचायतचे कामकाज या इमारतीतून चालू होईल.

या इमारत बांधकामाच्या भूमिपूजन प्रसंगी नगराध्यक्ष शेषराव जगताप, उपनगराध्यक्ष बन्सी भाऊ मुंडे, माजी नगराध्यक्ष राजाभाऊ अण्णा मुंडे,बाजार समितीचे सभापती संभाजी तात्या शिंदे,माजी जिल्हा परिषद सदस्य सर्जेराव महाराज आळणे, माजी सभापती दिनकरराव आंधळे, भारत दादा जगताप, माजी सरपंच गंपूशेठ पवार यांच्यासह महायुतीचे सर्व पदाधिकारी ,नगरसेवक नागेश डिगे, नगरसेवक सचिन सानप, नगरसेवक बाबा वाघमारे, नगरसेवक राहुल घाडगे, नगरसेवक गिन्यानदेव राठोड, नगरसेवक इस्माईल पठाण, नगरसेवक हरिदास टकले, नगरसेवक पप्पू ढोले, नगरसेवक गुरुप्रसाद माळवदे, नगरसेवक अरुण मुंडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष बजरंग साबळे,शहराध्यक्ष विठ्ठलराव भुजबळ, सुग्रीवजी मुंडे, मुस्तकिम भैय्या शेख, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष सुरेश दादा भोरे, कंत्राटदार संजय लाटे, खलील पठाण,ॲड.भास्कर उजगरे यांच्यासह तांत्रिक सल्लागार ओंकार कुलकर्णी, नगरपंचायतचे अभियंता सचिन कामटे, सुरज माने,संकेत शिंदे,अधिकारी, कर्मचारी,नागरिक व पत्रकार बांधव उपस्थित होते.

# धारूरमध्ये परीक्षा केंद्रातून इंग्रजीचा पेपर घेऊन दोघे पळाले

बीड । प्रतिनिधी

शिक्षण विभागाकडून विशेष खबरदारी घेतल्यानंतरही दहावीचा इंग्रजी विषयाचा पेपर जिल्ह्यातील धारुर येथील जिल्हा परिषद शाळेच्या परीक्षा केंद्रातून शनिवारी (दि. १ मार्च) सकाळी फुटला. पेपर सुरू झाल्यानंतर सकाळी साडेअकरा वाजता दोघांनी एका हॉलच्या खिडकीतून पेपर घेऊन पलायन केले.

दरम्यान, पोलिस निरीक्षक देविदास वाघमोडे यांनी अतिशय शिताफीने अवघ्या अर्ध्या तासात पेपर फोडणाऱ्या दोघांनाही ताब्यात घेतले असून त्यांच्याकडून पेपर जप्त केला आहे. माहिती मिळताच पोलिस निरीक्षक देविदास वाघमोडे यांनी लागलीच तपास सुरू केला. त्यानंतर अवघ्या अर्ध्या तासात दोघांना पोलिसांनी ताब्यात घेतले.

पोलिसी खाक्या दाखवताच घेऊन पळालेला इंग्रजी विषयाचा पेपर त्यांनी पोलिसांकडे सुपूर्द केला. दरम्यान, पेपरफुटीमुळे पालकांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे. शिक्षणाधिकारी मनोज कोल्हे यांनी पेपर फोडणाऱ्यांवर योग्य ती कारवाई केली जाईल असे स्पष्ट केले. तसेच या प्रकाराची शिक्षण विभागातील वरिष्ठांना माहिती दिली असल्याचे कोल्हे यांनी सांगितले.

दरम्यान, जिल्हा परिषद शाळेतील परीक्षा केंद्रातून दहावीच्या इंग्रजी विषयाचा पेपर घेऊन दोघे पळाले होते. त्या दोन तरुणांना आम्ही ताब्यात घेतले आहे. या पाठीमागे आणखीन कोण आहे? पेपर फोडणारी साखळी आहे का? या दृष्टिकोनातून तपास करण्यात येत असल्याची माहिती पोलिस निरीक्षक देवीदास वाघमोडे यांनी दिली आहे.

## भगवान सोनवणे यांचे निधन

दिंद्रुड । प्रतिनिधी

येथील सैलानी बाबा देवस्थान चे पुजारी भगवान भानूदास सोनवणे (वय ५० वर्ष) यांचे शनिवारी दुपारी



हृदयविकाराच्या झटक्यात निधन झाले. रविवारी सकाळी त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात येतील. त्यांच्या पश्चात दोन विवाहित मुलगे,दोन मुली, नातवंडे असा परिवार आहे.

# सामाजिक समतोल राखण्यासाठी सद्भावना पदयात्रेत सामील व्हा -राहुल सोनवणे

## जिल्ह्यात काँग्रेस ॲक्शन मोडवर : खासदार रजनी पाटलांचे विशेष लक्ष

माजलगाव । प्रतिनिधी

राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या नेतृत्वात जिल्ह्यातील मसाजोग ते बीड सदभावना पदयात्राचे काँग्रेसच्या वतीने आयोजन करण्यात आले आहे.

जिल्ह्यातील काँग्रेस ऍकशन मोडवर आली असून, खासदार सौ. रजनी पाटील यांनी विशेष लक्ष केंद्रित केल्याची चर्चा असून सदरील सदभावना पदयात्रा




यशस्वी करण्याच्या अनुषंगाने खासदार रजनी पाटील यांच्या सुचनेवरून काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे पाटील सक्रिय झाले असून, शहरातील काँग्रेस भवन येथे तालुकाध्यक्ष नारायण होके यांनी आढावा बैठकीचे आयोजन केले होते.

यावेळी सदरील बैठकीचे प्रस्ताविक काँग्रेस अनु. जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष दत्ता कांबळे यांनी केले. पान ३ वर

# शेती बांधाच्या वादावरून शेतकऱ्यात जबर हाणामारी

जालना । प्रतिनिधी

जाफराबाद तालुक्यातील सातेफळ निवडुंग शिवारात शेत जमिनीवरून असलेल्या जुन्या वादातून एका तरुणाला शेजारच्या शेतकऱ्यांनी बेदम मारहाण केल्याची घटना जालना जिल्ह्यातील जाफराबाद तालुक्यातील सातेफळ निवडुंग शिवारात घटना घडली आहे.या मारहाणीत तरुण गंभीर जखमी झाला



आहे. सदर घटनेत संशयित ११ जणांविरोधात टेंभुर्णी पोलीस ठाण्यात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

जाफराबाद तालुक्यातील सातेफळ शिवारात शेतातील बांधावरून गावातील दोन कुटुंबांमध्ये वाद सुरु आहेत. या वादातून सोमीनाथ वाघ आणि रवींद्र फंटे राजू राऊत आणि इतर ११ जणांनी वाघ यांना मारहाण केल्याची तक्रार टेंभुर्णी पोलीस ठाण्यात सोमीनाथ वाघ यांनी केली आहे.

# राजेश शिंदे यांचे हृदयविकाराच्या धक्क्याने निधन

**बीड । प्रतिनिधी**

संपूर्ण जिल्ह्यालाच नव्हे तर राज्याला हरहुन्नरी कलाकार म्हणून ओळख असलेले राजेश शिंदे यांचे शनिवारी हृदयविकाराच्या धक्याने दुःखद निधन झाले. त्यांच्यावर आज रविवारी सकाळी नऊ वाजता मोंढा अमरधाम स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. बीड जिल्ह्यातच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्राला फोटोग्राफीच्या दुनियेचा बाप माणूस म्हणून परिचित असलेले राजेश शिंदे यांचे शनिवारी दुपारी हृदयविकाराच्या धक्क्याने दुःखद निधन झाले. हा फोटोग्राफीच्या दुनियेत मोठा धक्का मानला जातो. अनेक वर्षे ते अभिनेते नाना पाटेकर आणि मकरंद अनासपुरे यांच्या नाम फाउंडेशनच्या कामाची फोटोग्राफी करत होते. नाम फाउंडेशन चा एक अविभाज्य भाग म्हणून राजेश शिंदे यांना ओळखले जात होते. याशिवाय सयाजी शिंदे यांचेही ते निकटवर्तीय होते. गेल्या अनेक वर्षापासून फोटोग्राफी मध्ये जिल्ह्याचे नाव उंचावण्यात त्यांचा मोठा वाटा आहे. असा हरहुन्नरी कलाकार आपल्यातून अचानक निघून गेला. त्यांना शनिवारी हृदयविकाराचा धक्का झाला आणि यातच त्यांचे दुःखद निधन झाले .त्यांच्यावर रविवारी सकाळी नऊ वाजता अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत आहे. पत्नी, दोन मुली, वडील ,भाऊ असा मोठा परिवार आहे.



# लेखणीतून समाजाच्या वेदनांचा हुंकार प्रगट व्हावा -प्रा.बिभिषण चाटे

## मराठी भाषा गौरव दिनानिमित्त एकताचे कवी संमेलन रंगले!

पाटोदा । प्रतिनिधी

"कवी लेखक साहित्यिक यांच्या लेखणीतून समाजाचे प्रतिबिंब उमटत असते; किंबहुना गोरगरीब दिन दुबळ्या अनाथ अपंग शेतकरी शेतमजूर आणि वंचित घटकांच्या समस्यांचा वेध घेत त्यांच्या वेदनांचा हुंकार विविध साहित्यातून वास्तविक आणि उत्कटपणे शब्दबद्ध व्हावा..!" अशी अपेक्षा ज्येष्ठ पत्रकार लेखक आणि महाराष्ट्र राज्य कनिष्ठ महाविद्यालय शिक्षक महासंघाचे बीड जिल्हा सचिव तथा एकता फाउंडेशनचे शेवगाव तालुका कोषाध्यक्ष प्रा. बिभीषण चाटे यांनी व्यक्त केली.

ज्येष्ठ साहित्यिक वि.वा. शिरवाडकर तथा कुसुमाग्रज यांच्या जन्मदिनाच्या निमित्ताने गुरुवारी दुपारी मराठी भाषा गौरव दिनाचे औचित्य साधत शांतीवन येथील निलामय सभागृहात महाराष्ट्र राज्य एकता फाउंडेशनच्या वतीने कवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी अध्यक्ष स्थानावरून प्रा.चाटे बोलत होते. मंचावर एकता फाउंडेशन महाराष्ट्र राज्याचे संस्थापक अध्यक्ष तथा मराठवाडा साहित्य परिषदेचे संचालक कवी साहित्यिक अनंत कराड,

पान ३ वर



# कुस्तीच्या जंगी सामन्यात महाराष्ट्र केसरी सईद चाऊस-निखील धोंडे यांची २५ हजारांची दवंडी कुस्ती

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील रुईनालकोल येथील जागृत देवस्थान असलेल्या महेश मंदिराचा महाशिवरात्रीनिमित्त दि.२६ ते २८ फेब्रुवारी २०२५ असा तीन दिवस यात्रा उत्सव संपन्न झाला.शुक्रवारी जंगी हंगाम्यात महाराष्ट्र केसरी सईद चाऊस आणि कडा कृ.उ.बा. समितीचे उपसभापती नामदेव धोंडे यांचे चिरंजीव निखील धोंडे यांची २५ हजार रु ची दवंडीची कुस्ती झाली.बुधवारी सकाळी ज्योत सोहळा,रात्री कीर्तन झाले. गुरुवारी छबीना व पालखी मिरवणुक झाली. करमाळा हलगी पथक,शोभेच्या दारुची अतीषबाजी झाली. शुक्रवारी सकाळी ९ वा.



रुईनालकोल येथील महेश देवस्थानची यात्रा संपन्न

कै.तुकाराम खेडकर व पांडुरंग मुळे लोकनाट्य तमाशा मंडळाच्या हजेऱ्या झाल्या.रात्री

मराठी परंपरा जोपासणारा पारंपारिक कै.तुकाराम खेडकर व पांडुरंग मुळे लोकनाट्य तमाशा लोकगीते,लावणी, बतावणी,सोबत वेस्टर्न नृत्याविष्कार असा मनोरंजनाचा कार्यक्रम झाला. दुपारी ३ ते ६.३० या वेळात भव्य जंगी कुस्त्यांचा हंगामा झाला.यावेळी माजी आ. भीमराव धोंडे उपस्थित होते. शनिवार दि.१ मार्च रोजी सायंकाळी ७ वा.मयुरी उत्तरेकर कोल्हापूरकर पान ३ वर

# किशोरवयीन आरोग्य दिवस साजरा

अंबड । प्रतिनिधी

दिनांक २८ फेब्रुवारी रोजी मस्त्योदरी विद्यालय लोणार भायगाव येथील शाळेत राष्ट्रीय किशोय स्वास्थ्य कार्यक्रम अंतर्गत किशोर वयीन आरोग्य दिवस साजरा करण्यात आला या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून मुख्याध्यापक केशव अटकर हे होते . तर समुपदेशक म्हणून उपजिल्हा रुग्णालय अंबड च्या सविता जाधव आणि अनंत सांगळे ,क्रांती माने यांची उपस्थित होते .

यावेळी किशोर वयीन मुला मुलींना सविता जाधव यांनी मार्गदर्शन केले - आपल्या भाषणात त्यांनी सांगितले की वाढत्या वयातील बदलानुसार संतुलित आहार घेणे आवश्यक आहे,व्यसनाधीनता हा समाजाला लागलेला कलंक आहे,आपण सर्वांनी मिळून व्यसनाधीनता संपवण्या साठी प्रयत्न करू यात यावेळी शाळेचे मुख्याध्यापक केशव अटकर यांनी मुलांनी उत्तम आणि सकस आहार घ्यावा,नियमित व्यायाम करावा, खाण्या मधे नियमित पने दूध,पालेभाज्या,फळे याचा समावेश असावा,मुलांनी हे आवडते ,हे आवडत नाही असे करू नये,शरीराला सर्व घटक आवश्यक असून अंडी आणि दूध आवश्यक आहेत,मुलांनी अभ्यासाकडे दुर्लक्ष करू नये आणि याच बरोबर उत्तम आरोग्य राहावे पान ३ वर



# कला पथकाच्या चित्तथरारक प्रात्यक्षिकांनी वडवणीकरांच्या डोळ्याचे पारणे फेडले

## वडवणीत हजारोंच्या उपस्थितीत ऐतिहासिक शिवजन्मोत्सव सोहळा पार पडला; शिवजयंती समितीचे चोख नियोजन; पोलिसांचा चोख बंदोबस्त

**वडवणी । प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती वडवणी शहरात भुतो ना भविष्याती साजरी करण्यात आली आहे. यामध्ये विविध कला पथकाच्या चित्तथरारक प्रात्यक्षिके सादर करून उपस्थितांच्या डोळ्यांचे पारणे फेडले. उंट, घोडे, महापुरुषांची वेशभूषा, सजवलेल्या मेघडंबरी राजमहालात छत्रपती शिवाजी महाराज यांची मुर्ती आकर्षक देखावा विविध कला सादर करुन ऐतिहासिक डिजेमुक्त सार्वजनिक शिवजन्मोत्सव सोहळा साजरा करण्यात आला आहे. या सोहळ्याला मराठा आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी भेट दिली होती.

गेल्या आठ दिवसांपासून वडवणी येथील सार्वजनिक शिवजन्मोत्सवाची तयारी अगदी जोमाने सुरू होती. शुक्रवार दि. २८ फेब्रुवारी रोजी वडवणी शहरात भव्य शोभायात्रा काढण्यात



आली. शोभायात्रेमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा मेघडंबरी राजमहाल आकर्षक देखावा सादर करण्यात आला. तसेच कोल्हापूर येथील कलाकारांची प्रसिध्द नादमय ढोल ताशा ध्वजपथकाने ढोल ताशांच्या



गजरात मंत्रमुग्ध केले. कोल्हापुर येथील युवक युवतींचे शिवकालीन युध्दकला खेळ पथकाने तलवारबाजी, तरुणांच्या पोटावरील केळी कापणे, तलवारीने लिंबू कापणे, काठी पान ३ वर

## संघर्षयोध्दा मनोज जरांगे पाटील यांनी जयंतीला दिली भेट

मराठा आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी वडवणी येथील शिवजन्मोत्सवाला भेट देऊन छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मुर्तीला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. पाटील यांच्या भेटीने तरुणात नवे चैतन्य निर्माण झाले होते. यावेळी तरुणांनी प्रचंड घोषणाबाजी करत घोषणांचा पाऊस पाडला. यावेळी छोट्या तालुक्यात देखील विविध कला पथक, आणि सजावट पाहून मराठा आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी शिवजन्मोत्सव समितीचे कौतुक केले आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# फरक पडत नाही, आधी तिकडे लक्ष द्या.!

## अजित पवारांच्या इशाऱ्याला वसंत मोरेंचं कडक शब्दात प्रत्युत्तर

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यातील स्वारगेट बस स्थानकातील शिवशाही बसमध्ये एका २६ वर्षीय तरुणीवर बलात्कार करण्यात आल्यानंतर राज्यभरातून संताप व्यक्त केला गेला. या प्रकरणातील आरोपी दत्तात्रय गाडेला तीन दिवसांनंतर अटक करण्यात आली.

मात्र तरुणीवर झालेल्या अत्याचारानंतर ठाकरे गटाचे नेते वसंत मोरे यांनी शिवसैनिकांसोबत बुधवारी स्वारगेट बस स्थानकात घुसून सुरक्षा रक्षकांची केबिनची तोडफोड केली होती. ज्यानंतर उद्धव ठाकरेंनी फोनवर संवाद साधत वसंत मोरेंचे कौतुक केले होते.

मात्र याच घटनेवरुन राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी वसंत मोरेंवर निशाणा साधला आहे. अजित पवार म्हणाले, स्वारगेट एसटी आगारात



घडलेली घटना ही निश्चितच दुर्दैवी आहे. अशा घटनांना आळा घालण्याचे सर्वतोपरी प्रयत्न सरकार करत आहे. स्वारगेट अत्याचार प्रकरणाचा पूर्ण तपास होऊन सत्यता पुढे येऊ द्या. एखादा आरोपी सापडत नाही म्हणून तोडफोड करत असाल तर, स्वतःला वेगळं दाखवण्याचा प्रयत्न कराल. सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान कोणी करत असेल तर तो पक्ष किंवा त्या कार्यकर्त्याकडून वसूल केला पाहिजे, असं कोर्टाने सांगितलं आहे.

स्वतःला वेगळं दाखवण्याच्या प्रयत्नात कोणी सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करत असेल तर ते खपवून घेतले जाणार नाही. काही प्रकरणात राग व्यक्त करण्याच्या काही गोष्टी असू शकतात.

काही अतिउत्साही कार्यकर्त्यांचा उत्साह पाहायला मिळतोय, त्यांच्यावरही कायद्याच्या चौकटीत राहून कारवाई केली जाईल, असे अजित पवार यांनी नाव न घेता वसंत मोरे यांच्यावर टीका केली.

दरम्यान, आता अजित पवारांच्या या टीकेला वसंत मोरेंनी जोरदार शब्दात प्रत्युत्तर दिल आहे. माध्यमांशी बोलताना वसंत मोरे म्हणाले की, 'आदरणीय दादा चार काचा फुटल्या त्याची काळजी आहे मग त्या आमच्या बहिण्याच्या इज्जतच्या काचा फुटल्या त्याची जबाबदारी कोण घेणार? असा थेट सवालच त्यांनी अजित पवारांना केला आहे.


ते पुढे म्हणाले, जे कार्यकर्ते अशा विषयांमध्ये प्रतिक्रिया देतात त्यांच्यावर तुम्ही गुन्हे दाखल करणार असेल तर बिनधास्त करा, अस्वलाच्या अंगावर जर एखादा केस वाढला तर त्याला फरक पडत नाही. त्यामुळे एखाद्या माझ्या बहिणीसाठी जर मी अशा प्रकारचं पाऊल उचल असलं तर त्याला संपूर्ण महाराष्ट्राने पाहिलं आहे.

अजितदादा या राज्याचे खूप मोठे नेते आहेत. माझ्या वर गुन्हे दाखल होणार असेल तर बिनधास्त होउदे, त्याच बरोबर या शहरात दिवसेंदिवस कोयता गँग फिरत आहे, मर्डर होत आहे.. याकडे देखील त्यांनी लक्ष दिलं पाहिजे'. असं देखील यावेळी वसंत मोरे म्हणाले.

## जीबीएस रुग्णांसाठी आर्थिक मदत सुरु ठेवा; माजी नगरसेवकांची आयुक्तांकडे मागणी

**पुणे । प्रतिनिधी**

गुलियन बॅरी सिंड्रोमचे (जीबीएस) रुग्ण कमी झाल्याने या रुग्णांच्या उपचारासाठी महापालिकेतर्फे केली जाणारी आर्थिक मदत बंद करण्याचा प्रस्ताव आरोग्य विभागाने ठेवला असला तरी आयुक्तांनी तो प्रस्ताव फेटाळून लावावा.



या रोगाचा पूर्ण नायनाट झालेला नसताना ही मदत बंद करणे अन्यायकारक आहे. त्यामुळे आर्थिक मदत देण्याची योजना सुरु ठेवावी अशी मागणी माजी नगरसेवकांनी आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांच्याकडे केली आहे.

महापालिकेतर्फे दूषित पाणी पुरवठा केला जात असल्याने जीबीएस आजार होत आहे. या आजाराचा खर्च लाखो रुपयात असल्याने नागरिकांना आर्थिक मदत करावी असे आदेश केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी दिले होते.

त्यानंतर महापालिकेने यासंदर्भातील परिपत्रक काढले होते. जीबीएसचे रुग्ण कमी झाले असल्याने या रोगाचा नायनाट झाला असे नाही, यासंदर्भात महापालिकेने केंद्र अथवा राज्य सरकारकडे काही विचारणा केली आहे का?, या आजाराचे मुळ हे अशुद्ध पाण्यात आहे. त्यामुळे हा आजार झाल्यास नागरिकांना आर्थिक मदत महापालिकेने केली पाहिजे.

महापालिकेने आत्तापर्यंत ३५ रुग्णांना ४९ लाखाची मदत केली असली तरीही पुणेकरांचे हीत लक्षात घेता आर्थिक मदत बंद करण्याचा निर्णय घेऊ नये अशी मागणी माजी नगरसेवक उज्वल केसकर, सुहास कुलकर्णी, प्रशांत बधे यांनी केली आहे.

## प्रसिद्ध लेखिका, प्रवास वर्णनकार डॉ. मीना प्रभू यांचे निधन

**पुणे । प्रतिनिधी**

प्रसिद्ध मराठी प्रवासवर्णनकार, कादंबरीकार आणि कवयित्री डॉ. मीना प्रभू यांचे निधन झाले आहे. त्या ८५ वर्षांच्या होत्या आणि गेल्या काही काळापासून आजारी होत्या. त्यांच्यावर खासगी रूग्णालयात उपचार सुरू होते. प्रवास वर्णनकार म्हणून त्यांची पुस्तके प्रसिध्द होती. त्यांच्या जाण्याने मराठी साहित्यविश्वात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. डॉ. मीना प्रभू या मूळच्या पुण्याच्या होत्या, पण विवाहानंतर लंडनमध्ये स्थायिक झाल्या होत्या. पेशाने भुलतज्ञ असलेल्या प्रभू यांनी आपल्या लेखनाने प्रवासवर्णनाला एक वेगळेच वलय प्राप्त करून दिले होते.



प्रवास वर्णनकार म्हणून त्या प्रसिध्द होत्या. त्यांचे पहिले प्रवासवर्णनपर पुस्तक 'माझं लंडन' होते. मीना प्रभूंनी १२ पेक्षा अधिक प्रवासवर्णने लिहिली होती. त्यामध्ये त्यांनी जगातील निरनिराळ्या ठिकाणांची ज्ञान देणारी व रंजन अशी माहिती दिली होती. त्यांची 'माझं लंडन', 'इजिप्तायन,' 'तुर्कनामा,' 'ग्रीकांजली,' 'चिनी माती' अशी अनेक पुस्तके लोकप्रिय झाली.

मीना प्रभू यांनी जगातल्या अनेक देशांमध्ये प्रवास केला आहे, त्याची प्रवासवर्णने लिहिली. त्यावर अनेक पुस्तके प्रकाशित झाली आहेत. त्यांचे प्रवासवर्णनांवरील लेख विविध वृत्तपत्रे, मासिके यामध्ये प्रकाशित झाले होते.

मीना प्रभू यांनी गोव्यातील महिला साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद भुषविले आहे. तसेच मीना प्रभू यांना दि. बा. मोकाशी पारितोषिक-२०१०, गो. नी. दांडेकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ मृण्मयी पुरस्कार-२०११, न. चिं. केळकर पुरस्कार-२०१२, महाराष्ट्र साहित्य परिषदेचा जीवनगौरव पुरस्कार असे अनेक पुरस्कार मिळाले. त्यांच्या अनेक पुस्तकांना महाराष्ट्र राज्य पुरस्कार देखील मिळाले. त्यांनी पुण्यात २०१७ मध्ये 'प्रभू ज्ञानमंदिर' हा अत्याधुनिक किंडल लायब्ररीचा प्रकल्प सुरू केला होता.

## वाघोलीत वाहनांच्या काचा फोडल्या

**वाघोली । प्रतिनिधी**

लोखंडी शस्त्राने वाहनांच्या काचा फोडून दहशत पसरविण्यात आल्याची घटना वाघोली येथील एस टी कॉलनी येथे मंगळवारी (दि. २५) मध्यरात्री सव्वा दोनच्या सुमारास घडली. याप्रकरणी वाघोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

एसटी कॉलनी येथे मध्यरात्री एक जण हातामध्ये कोणतेतरी लोखंडी शस्त्र घेऊन गाड्यांचे काचा फोडत मोठ्याने आरडा ओरडा करत हातातील लोखंडी शस्त्र हवेत फिरवून, दहशत करत होता. त्याने चार वाहनांच्या काचा फोडल्या होत्या. त्यानंतर तो पसार झाला.

घटनेची माहिती पोलिसांना कळविण्यात आल्यानंतर याबाबत ज्ञानदेव मेहेत्रे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार वाहनाचा काचा फोडून, मोठमोठ्याने आरडा ओरडा करत, हातातील लोखंडी शस्त्र हवेत फिरवुन, दहशत करून वाहनांच्या काचा फोडून नुकसान केल्याने गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास वाघोली पोलीस करीत आहेत.

## वाघोलीत डंपरच्या धडकेत दुचाकीवरील तरुण ठार

**वाघोली । प्रतिनिधी**

डंपरने दुचाकीला दिलेल्या धडकेत दुचाकीवरील तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना वाघोली येथील लोहगाव चौक परिसरात शुक्रवारी मध्यरात्री दीडच्या सुमारास घडली. याप्रकरणी डंपर चालकावर वाघोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

यश नामदेव (वय-३१, रा. पार्कलेन प्रीमियर सोसायटी, वाघोली) असे अपघातात मृत्यूमुखी पडलेल्या तरुणाचे नाव आहे. याप्रकरणी डंपरचालक कृष्णा सोपान गुट्टे (वय-३८, रा. वाघोली) याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहिती नुसार, यश हा दुचाकीवरून घरी जात असताना लोहगाव चौकात भावडी कडून




येणाऱ्या डंपरने दुचाकीला धडक दिली.

डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने पाठीमागून येणाऱ्या मित्रांनी त्याला रुग्णालयात दाखल केले. मात्र उपचारापूर्वीच त्याचा मृत्यू झाला होता. चालकास पोलिसांनी ताब्यात घेतले असून चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास वाघोली पोलीस करीत आहे.

मागील दहा दिवसात वाघोलीत अपघातात तिघांचा बळी गेला. दोघांचा टँकरच्या धडकेत तर यश हा डंपर अपघाताचा बळी ठरला. मागील काही महिन्यात अपघातांचे सत्र थांबले होते. मात्र आता पुन्हा अपघातांचे सत्र सुरू झाले आहे.

## मुली व महिलांना कर्करोगावरील लस देणार

**पुणे । प्रतिनिधी**

महिलांमध्ये कर्करोगाचे प्रमाण सातत्याने वाढत आहे. त्यावर, लस आल्याचे आरोग्यमंत्र्यांनी सांगितले आहे. ही लस राज्यातील मुली व महिलांना देण्याबाबत महायुतीचे सरकार विचार करत आहे.

यामध्ये माझ्यासह आरोग्य विभाग, वैद्यकीय शिक्षण विभाग, शालेय शिक्षण विभाग या सर्वच विभागाच्या मंत्रिमंडळाने लक्ष घातले आहे, ही लस देण्याबाबतची ग्वाही राज्याचे उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी दिली.



औंध येथील इंदिरा गांधी मॉडेल स्कूल येथे आयोजित राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम अंतर्गत विशेष तपासणी मोहिमेचा शुभारंभ आणि राज्यस्तरीय मेळाव्याच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर, दूरदृष्यप्रणीलीद्वारे शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे, पुणे महानगर पालिकेचे आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, आरोग्य सेवा संचालक डॉ. नितीन अंबाडेकर, शहरी आरोग्य सेवा संचालक डॉ. स्वप्नील लाळे, अतिरिक्त संचालक डॉ. बबिता कमलापूरकर आदी उपस्थित होते.

पुढे पवार म्हणाले की, याअंतर्गत राज्यातील सर्व बालकांची डोक्यापासून नखा पर्यत वैद्यकीय तपासणी करण्यात येणार आहे. यामाध्यमातून बालकांच्या आरोग्य विषयी माहिती मिळणार आहे. पहिल्याच टप्प्यात शारीरिक, मानसिक आजाराचे निदान होऊन त्यांच्यावर वेळेत मोफत उपचार करता येणार आहे. बालकांचे आरोग्य एखाद्या कुटुंबापुरते मर्यादित नसून ते समाज, देशाच्या उज्ज्वल भविष्याकरीता महत्त्वाचे असते. दूरदृष्यप्रणीलीद्वारे मंत्री दादा भूसे म्हणाले, एकही विद्यार्थी उपचारापासून वंचित राहणार नाही, याबाबत शालेय शिक्षण विभागाने दक्षता घ्यावी. विद्यार्थ्यांना होणाऱ्या आजारावर वेळेत उपचार होण्याकरिता आगामी काळात एक कक्ष स्थापन करण्याबाबत नियोजन करावे.

प्रकाश अबिटकर म्हणाले की, राज्य शासनाच्या १०० दिवसाच्या विशेष कार्यक्रमाअंतर्गत राज्यातील सुमारे दोन कोटी बालकांची आरोग्य तपासणी करण्यात येत आहे. प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण जिल्हा रुग्णालय उप जिल्हा रुग्णालयाचेही लोकार्पण करून नागरिकांना अधिकाधिक आरोग्यविषयक सेवा देण्याचे काम विभागाच्यावतीने करण्यात येत आहे.

## तहसील कार्यालयाच्या पार्किंगमध्ये 'महाराष्ट्र शासन' नेमप्लेट असलेल्या गाडीवर कारवाई

**शिरूर । प्रतिनिधी**

शिरूर तहसील कार्यालयाच्या पार्किंगमध्ये पुणे येथील एका मंडलाधिकाऱ्याची खाजगी गाडी 'महाराष्ट्र शासन 'अशी पाटी लावून आली. ही बाब सामाजिक कार्यकर्ते निलेश वाळुंज यांच्या लक्षात येताच त्यांनी तातडीने शिरूरचे पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांना या गाडीवर कारवाई करण्याबाबत मागणी केली.

वाळुंज यांनी सजग नागरिकांसह आवाज उठवल्यानंतर वाहतुक पोलीसांकडून संबंधित वाहन मालक यांच्यावर त्वरित दंडात्मक कारवाई करण्यात येवून त्याच ठिकाणी दंडही पोलिसांनी भरून घेतला. अशा पाट्या लावून फिरणाऱ्या सरकारी बाबूंच्या गाडीवर शिरूर मधे झालेली ही पहिलीच कारवाई आहे.

शिरूर तालुक्यातील नवीन प्रशासकीय इमारतीमधील वाहनतळावर पुणे महसूल खात्यातील एक अधिकारी स्वतःच्या वाहनावर आतील दर्शनी भागात महाराष्ट्र शासन अशी पाटी लावून तहसीलदारांच्या शासकीय



गाडीजवळ त्यांचे वाहन लावून थाटात दाखल झाले. महाराष्ट्र शासन पाटी असल्याने तेथील सुरक्षा रक्षकाने गाडी मागे घ्यायला सांगून बाजूला असलेल्या दुसऱ्या सरकारी वाहनाशेजारी बॅरिगेट बाजूला करून गाडी लावण्यासाठी जागा दिली. सर्वसामान्य नागरिकांना अनेकदा तहसील कार्यालयात स्वतःची वाहने लावयला जागा नसते, मात्र समोरील बाजूस शासकीय वाहनांसाठी बॅरिगेट्स लावून ठेवले जातात. जेणेकरून इतर नागरिक वाहन लावू शकणार नाहीत. जागा असूनही नागरिकांची मात्र यामुळे गैरसोय होत असते, परंतु काही अधिकारी/कर्मचारी स्वतःच्या वाहनांना महाराष्ट्र शासन पाटी लावून थाटात येतात आणि त्यांना सुरक्षारक्षक शासकीय गाडी समजून तत्काळ बॅरिगेट्स हटवून जागा करून देतात ही बाब चुकीची असून तेथे उपस्थित असलेले वाळुंज यांना हे निदर्शनास आल्यानंतर ते नागरिकांसह गाडीजवळ जाऊन ही बाब शिरूर पोलीस निरीक्षक केंजळे यांना कळवली आणि कारवाई करण्याची मागणी केली.

पोलिस निरीक्षक यांनी तत्काळ वाहतूक पोलीस राजेंद्र वाघमोडे यांना घटनास्थळी पाठवले. वाघमोडे यांनी वाहन चालक आणि मालक यांना अशी पाटी लावून तुम्हाला वाहन फिरवता येणार नाही, असे सांगून लावलेल्या पाटीसह मशिनद्वारे फोटो काढून तत्काळ ऑनलाइन ५००/- रुपये दंड आकारून कायदेशीर कारवाई केली. शिवाय हा दंड ही जागेवरच लगेच ऑनलाइन पेमेंट पद्धतीने भरून घेण्यात आला. आणि लावलेली पाटीही तत्काळ उतरवण्यास सांगितली.

## संबंध संमतीने झाले होते, मात्र व्यवहाराचे पैसे दिले नाहीत म्हणून, रुपाली पाटलांचा दावा

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यातील स्वारगेट बस डेपोमध्ये २६ वर्षीय तरुणीवर बलात्कार केल्याचा आरोपी दत्तात्रय रामदास गाडे याला न्यायालयाने १२ मार्चपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. २५ फेब्रुवारीच्या दिवशी शिवशाही बसमध्ये आरोपीने तरुणीवर दोनदा अत्याचार केला, असे पोलिसांनी शुक्रवारी न्यायालयात सांगितले. तीन दिवसांच्या शोधानंतर पोलिसांनी शुक्रवारी रात्री १:१० च्या सुमारास पुणे जिल्ह्यातील शिरूर तालुक्यातील गुणट गावातून गाडेला अटक केली. ससून रुग्णालयात वैद्यकीय तपासणीनंतर त्याला अटक करण्यात आली. वरिष्ठ पोलिस निरीक्षक युवराज नांद्रे यांच्यासह पोलिस पथकाने गाडे यांना सायंकाळी ६.१५ वाजता न्यायदंडाधिकारी (प्रथम वर्ग) टी.एस. गायगोले यांच्या न्यायालयात हजर केले. याचदरम्यान आता स्वारगेट अत्याचार प्रकरणात राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या रुपाली पाटील ठोंबरे यांनी मोठा दावा केला आहे.

दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या रुपाली पाटील ठोंबरे यांनी केलेल्या दाव्यामुळे या प्रकरणाला वेगळेच वळण लागले आहे. स्वारगेट अत्याचार प्रकरणात संबंध संमतीने झाले होते, मात्र व्यवहाराचे पैसे दिले नाहीत, म्हणून हा वाद निर्माण झाला आहे. त्यामुळे पुणे शहराला नाहक बदनामी सहन करावी लागली, म्हणून याचा प्रचंड खेद वाटतो. त्यांनी फेसबुक पोस्टमधून याविषयी सांगितलं आहे. याआधी, गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनीही फोर्सफुल प्रकार घडला नसल्याचं म्हटलं होतं.

पोलिसांनी न्यायालयाला सांगितले की, पीडित महिला सकाळी ५:३० वाजता स्वारगेट बस डेपोमध्ये तिच्या गावी सातारा येथे जाण्यासाठी बस पकडण्यासाठी वाट पाहत होती. आरोपी गाडे बस डेपोमध्ये फिरत होता. तो पीडितेकडे गेला आणि तिला विचारले, ताई, तू कुठे जात आहेस? तिने उत्तर दिल्यावर, गाडेने तिला सांगितले की तिच्या गावी जाणारी बस डेपोमध्ये दुसऱ्या ठिकाणी उभी आहे. पोलिसांनी सांगितले की, आरोपी गाडे तिला वारंवार ताई म्हणत होता, ज्यामुळे पीडितेने त्याच्यावर विश्वास ठेवू लागला. पण त्याने तिला दिशाभूल केली आणि डेपोमध्ये उभ्या असलेल्या शिवशाही बसमध्ये नेले.

बसमध्ये लाईट नव्हती, पण आरोपीने तिला सांगितले की प्रवासी झोपले असतील आणि तो मोबाईल फोनचा फ्लॅश वापरून बघून शकते, असं म्हणत पीडितेला बसमध्ये पाठवल. त्यानंतर पीडितेच्या मागून जाऊन तिच्यावर अत्याचार केला. त्यानंतर त्याच अवस्थेत टाकून आरोपीने तिथून पळ काढला. या घटनेनंतर पीडितेने बसमधून उतरली आणि तिच्या गावी जाण्यासाठी दुसऱ्या बसमध्ये चढली. हडपसरला पोहोचल्यावर तिने तिच्या मित्राला फोन करून घटनेची माहिती दिली. मित्राने धीर दिल्यानंतर पुन्हा स्वारगेट बस स्थानकात येऊन स्वारगेट पोलिस ठाण्यात गेली आणि भारतीय दंड संहितेच्या (इछड) कलम ६४, ३५१ (२) अंतर्गत आरोपींविरुद्ध एफआयआर दाखल केली.

## निरवांगी खुन प्रकरणातील आरोपी २४ तासाच्या आत जेरबंद; वालचंदनगर पोलिस व स्थानिक गुन्हे शाखा पोलिसांची कारवाई

**वालचंदनगर । प्रतिनिधी**

निरवांगी (ता.इंदापूर) जवळील खुन प्रकरणातील पाच आरोपींना वालचंदनगर पोलिस व स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांची कारवाई शिताफितीने २४ तासाच्या आतमध्ये जेरबंद करुन अटक केली.

याप्रकरणी पोलिसांनी आठ जणांवर गुन्हा दाखल केला असून यातील राजेंद्र उर्फ राजु भाळे, रामदास उर्फ रामा भाळे ,नाना भागवत भाळे (रा.सर्वजण खोरोची) , शुभम उर्फ दादा आटोळे, (रा.शेळगाव) व स्वप्निल उर्फ बालाजी वाघमोडे (रा. रेडणी) या पाच आरोपींना २४ तासाच्या आतमध्ये अटक केली. हे आरोपी हैद्राबादला पळून जाण्याच्या तयारीमध्ये होते. या घटनेमध्ये उत्तम जालिंदर जाधव (वय ३४,रा.खोरोची) यांचा उपचार सुरु असताना मृत्यू झाला.

वालचंदनगर पोलिसांनी दिलेल्या माहितीनूसार गुरुवार(ता.२७) दुपारी साडे बारा वाजण्याच्या सुमारास उत्तम जाधव




हे निमसाखर गावच्या हद्दीमध्ये जेसीबी चालकाला जेवणाचा डब्बा देण्यासाठी गेले असताना राजु भाळे, रामा भाळे ,नाना भागवत भाळे (रा.सर्वजण खोरोची) , दादा आटोळे, (रा.शेळगाव) , बालाजी वाघमोडे (रा. रेडणी), तुकाराम खरात, निरंजन पवार (रा.खोरोची), जिजा ऊर्फ मयुर पाटोळे (रा.निमसाखर) या आठ जणांनी जाधव यांच्यावर कोयता,तलवारीने वार करुन लोखंडी रॉडने तसेच पाय दगडाने ठेचले होते. उत्तम जाधव हे गंभीर जखमी झाले होते.

जाधव यांना उपचारासाठी अकलुज मधील खासगी रुग्णालयामध्ये दाखल केले होते. उपचार सुरु असताना गुरुवारी रात्री मृत्यू झाल्याची घटना घडली. वालचंदनगर पोलिसांनी रात्री उशीरा गुन्हा दाखल केल्यानंतर वालचंदनगर पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक राजकुमार डुणगे यांच्यासह कर्मचाऱ्यांनी तातडीने तपासाला सुरवात करुन आरोपींना अटक करण्यासाठी पोलिस पथके रवाना केली. २४ तासाच्या आतमध्ये पोलिसांनी आरोपींना जेरबंद केले आहे.याप्रकरणी शामराव जालिंधर जाधव (वय वय-३६) यांनी वालचंदनगर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

सदरची कामगिरी पुणे जिल्हाचे पोलिस अधिक्षक पंकज देशमुख, अप्पर पोलिस अधिक्षक गणेश बिरादार ,बारामतीचे उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ.सुदर्शन राठोड, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री.अविनाश शिळीमकर, यांच्या मार्गदर्शनाखाली वालचंदनगर पोलीस स्टेशनचे सहायक राजकुमार डुणगे, सहायक पोलीस निरीक्षक, कुलदिप संकपाळ पोलीस उपनिरीक्षक मिलिंद मिठापल्ली, विजय टेळकीकर, गुलाबराव पाटील, शैलेश स्वामी, जगदीश चौधर, गणेश काटकर, दादासाहेब डोईफोडे, दत्तात्रेय चांदणे, महेश पवार, विकास निर्मळ, अभिजीत कळसकर,विक्रमसिंह जाधव, गणेश वानकर , बाळासाहेब कारंडे, अभिजीत एकशिंगे, स्वप्नील अहिवळे, अतुल ढेरे यांनी केली.